# मराठा आरक्षण विधेयक एकमताने मंजूर

## ▪ शिक्षण आणि नोकऱ्यांमध्ये मिळणार १० टक्के आरक्षण

रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक २१५
www.ramprahar.com
**राम प्रहर**
बुधवार, २१ फेब्रुवारी २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

**अंतरंग**

आजपासून बारावीची लेखी परीक्षा; शिक्षण मंडळ सज्ज/२
कर्जतमध्ये गुरांनी भरलेला टेम्पो पकडला/५
जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेत वैभव शिंदे विजेता/८

**मुंबई : प्रतिनिधी**

**ओबीसी अथवा इतर कोणत्याही समाजाच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देण्याचा निर्णय घेण्यात आला असून मंगळवारी (दि.२०) विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने हे विधेयक मंजूर करण्यात आले. विधेयकावर राज्यपालांची स्वाक्षरी झाल्यानंतर मराठा समाजाला नोकरी आणि शिक्षणात १० टक्के आरक्षण असणार आहे. त्यामुळे या समाजाला मोठा दिलासा मिळाला आहे.**



मराठा समाजाचे मागासलेपण दूर करण्यासाठी आरक्षण मिळवून देणे हा पर्याय होता. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत आरक्षण मिळवून द्यायचा निर्धार शासनाने केला होता. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सभागृहाची मराठा आरक्षणास संमती मिळाल्याने फेब्रुवारी २०२४मध्ये विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवून या विषयावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यात येईल, हे जाहीर केले होते. त्यानुसार आजचा दिवस अमृत पहाट घेऊन आला आहे. माझ्यासह उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार तसेच संपूर्ण मंत्रिमंडळ गेले १५० दिवस अहोरात्र मेहनत घेत होते, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या वेळी आवर्जून सांगितले.

दरम्यान, मराठा समाजाला आरक्षण देण्याचे विधेयक विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात पास झाल्यानंतर सत्ताधारी आमदारांनी विधानभवन परिसरात जल्लोष केला. गुलालाची उधळण करून व फटाके फोडून आरक्षण मंजूर झाल्याचा आनंद साजरा करण्यात आला.

### निर्णय ऐतिहासिक आणि कायद्याच्या कसोटीवर टिकणारा -मुख्यमंत्री शिंदे

मराठा समाजास १० टक्के आरक्षणासाठी घेतलेला हा निर्णय ऐतिहासिक, धाडसी आणि कायद्याच्या कसोटीवर टिकणारा असल्याचे सांगून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे विधेयक विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात एकमताने संमत केल्याबद्दल सर्व सदस्यांचे आभार मानले. मराठा समाजाला टिकणारे आणि कायद्याच्या चौकटीत बसणारे आरक्षण मिळवून देण्यासाठी शासनाने मोठे पाऊल उचलले आहे. आता ते टिकून राहावे म्हणून राज्य सरकार आपली सर्व शक्ती पणाला लावणार आहे, असेही ते म्हणाले.

### कायदा पारित झाल्यापासून आरक्षण लागू होणार -उपमुख्यमंत्री फडणवीस

या वेळी प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आमच्या सरकारने मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देण्याचे विधेयक मांडले. दोन्ही सभागृहात हे विधेयक एकमताने मंजूर करण्यात आले आहे. त्यामुळे मराठा समाजाला आरक्षण मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. एकदा कायदा पारित झाल्यानंतर आता जेवढ्या जाहिराती निघतील, त्या सर्व ठिकाणी मराठा समाजाला आरक्षण असेल.

---

## खारकोपर स्टेशनसमोरील शिवस्मारक आणि खेळाचे मैदान

# दोन्ही आरक्षित जागा सुशोभित करून गव्हाण ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करा -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गेली सहा वर्षे संघर्ष केल्यानंतर अखेरीस सिडकोने खारकोपर रेल्वेस्टेशनसमोरील शिवस्मारक आणि खेळाच्या मैदानासाठीची सेक्टर १२मधील प्लॉट नंबर ३ व ४ ही जागा आरक्षित केली आहे. ही जागा तातडीने विकसित करून गव्हाण ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करावी, अशी मागणी छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केली आहे.



गेली तीन वर्षे याच ठिकाणी समितीतर्फे शिवजयंती उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा करण्यात येत आहे. या वर्षीही सोमवारी (दि.१९) भव्य दिव्य प्रमाणात साजरी करण्यात आली. उलवे आणि परिसरातील लोकांच्या भावना या नियोजित शिवस्मारकाशी जोडल्या गेल्या आहेत. त्यामुळे अटल सेतूच्या पार्श्वभूमीवर शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याची उभारणी करण्यासाठी सर्व शिवप्रेमी उत्सुक आहेत. यंदाच्या शिवजयंती उत्सव सोहळ्यात कामगार नेते महेंद्र घरत म्हणाले की, हा अश्वारूढ शिवाजी महाराजांचा पुतळा येथे उभारण्याची संकल्पना लोकनेते रामशेठ ठाकूर यांचीच. रामशेठ यांनी मनावर घेतले तर ते काहीही करून दाखवतील. स्व.जनार्दन भगतसाहेबांनी या भागाच्या विकासाचा पाया रचला आणि रामशेठ यांनी त्यावर कळस चढवला. लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा जेथे हात लागतो त्या बाबीचे सोने होते. गव्हाण ग्रामपंचायतीने या खेळाच्या मैदानाला लोकनेते रामशेठ ठाकूर यांचेच नाव एकमताने दिल्याचे महेंद्र घरत म्हणाले. आम्ही या भागाचा विकास करताना पायातल्या राजकारणाच्या चपला बाहेर काढतो आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली काम करतो, असेही घरत शेवटी म्हणाले.



दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील सर्वपक्षीय प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीचे अध्यक्ष, माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी १७ डिसेंबर २०१८ रोजी सिडकोचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांना याबाबत सविस्तर पत्र लिहिले होते. त्यामध्ये खारकोपर स्टेशनसमोरील सेक्टर १२मधील पाच हजार चौरस मीटर (०.५ हेक्टर) जागा ही शिवस्मारकासाठी आणि २० हजार चौरस मीटर (२ हेक्टर) जागा खेळाचे मैदान विकसित करून देण्यासाठीची मागणी केली होती. पुन्हा १ फेब्रुवारी २०१९ रोजी सिडकोच्या अध्यक्षांसोबत या दोन्ही जागांबाबत बैठक झाली. त्यानंतर ४ ऑगस्ट २०२० रोजी पुन्हा याच मुद्द्यांवर सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांच्यासोबत झालेल्या बैठकीत हे दोन्ही भूखंड विकसित करण्याबाबत लोकनेते दि. बा. पाटील सर्वपक्षीय कमिटीने पत्र दिले. सिडको अध्यक्षांच्या उपस्थितीत १ फेब्रुवारी २०१९ रोजी झालेल्या बैठकीला लोकनेते रामशेठ ठाकूर, सर्वपक्षीय प्रकल्पग्रस्त संघर्ष समितीचे सेक्रेटरी आणि कामगार नेते महेंद्र घरत तसेच मुख्य अभियंता वरखेडकर, अधीक्षक अभियंता गिरी, अतिरिक्त मुख्य नियोजनकार मानकर उपस्थित होते.

सिडकोचे तत्कालीन नवे अध्यक्ष संजय मुखर्जी यांच्यासोबत ३ ऑगस्ट २०२१ रोजी बैठक घेतली. या बैठकीत शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यासाठी आणि मैदानासाठी आरक्षित केलेले भूखंड सिडकोने सुशोभित करून गव्हाण ग्रामपंचायतीकडे हस्तांतरित करावे, अशी मागणी करणारे गव्हाण ग्रामपंचायतीचे सरपंच यांचे पत्र सिडकोकडे देण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या जुन्या पुतळ्याची दुरवस्था झाल्याचेही या पत्रात नमूद करण्यात आले होते. दरम्यान, तात्पुरत्या कामासाठी सदर २.५ हेक्टरचा भूखंड हा एमएमआरडीएकडे देण्यात आला. शिवस्मारक आणि खेळाच्या मैदानासाठी आरक्षित केलेला हा भूखंड तातडीने परत मिळावा, अशी मागणी करण्याकरिता सिडकोने ६ जुलै २०२० रोजी एमएमआरडीएला पत्र लिहिले, मात्र एमएमआरडीएने २ ऑगस्ट २०२१ रोजी लिहिलेल्या पत्रात हे दोन्ही भूखंड सप्टेंबर २०२३पर्यंत आमच्या वापरात राहातील, असे म्हटले. सप्टेंबर २०२३नंतर हा भूखंड मोकळा होईल, असे एमएमआरडीएच्या या पत्रावरून स्पष्ट होते, मात्र लोकनेते रामशेठ ठाकूर आणि गव्हाण ग्रामपंचायत सातत्याने पुन्हा पुन्हा सिडकोकडे मागणी करीत होतेच.

दरम्यान, सिडकोचे उलवे २ येथील कार्यकारी अभियंता यांनी सेक्टर १२मधील प्लॉट नंबर ३ आणि ४ हे भूखंड उद्यानासाठी, खेळाच्या मैदानासाठी आरक्षित करण्यात येत असल्याचे पत्र गव्हाण ग्रामपंचायतीच्या सरपंचांना २ फेब्रुवारी २०२२ रोजी दिले. दोन्ही भूखंडांसाठी एवढ्या मोठ्या प्रमाणावर संघर्ष आणि सातत्यपूर्ण पाठपुरावा करण्यात आला. खारकोपर स्टेशनसमोरील हे दोन्ही भूखंड, सेक्टर १२मधील शिवस्मारकासाठीचा ५ हजार चौरस मीटर (०.५ हेक्टर) आणि खेळाच्या मैदानासाठीचा २० हजार चौरस मीटर (२ हेक्टर) विकसित करण्याचे काम तातडीने सुरू करण्याचे आश्वासन सिडको व्यवस्थापनाने ३१ जुलै २०२० रोजी दिले आहे. याची आठवणही ४ ऑगस्ट २०२० रोजीच्या पत्राने लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी करून दिली. सिडकोच्या व्यवस्थापकीय संचालकांना खारकोपर स्टेशनसमोरील छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी व सुशोभीकरण समितीने अखेरीस १५ फेब्रुवारी २०२४ रोजीच्या पत्रात या संपूर्ण संघर्षाची माहिती दिली आणि अडीच हेक्टर जागा गव्हाण ग्रामपंचायतीला लवकरात लवकर हस्तांतरित करावी, अशी मागणी केली आहे.

---

## कुरकुंभ एमआयडीसीतील कंपनीत ११०० कोटींचे ड्रग्ज जप्त



**पुणे : प्रतिनिधी**

दौंड (ता. पुणे) तालुक्यातील कुरकुंभ औद्योगिक वसाहतीत असलेल्या अर्थकेम लॅबोरटीज कंपनीवर गुन्हे शाखेने मंगळवारी (दि.२०) छापा टाकून ११०० कोटी रुपयांचे किमतीचे ६०० किलो मेफेड्रोन ड्रग्ज जप्त केले आहे. मेफेड्रोन निर्मिती तसेच विक्री प्रकरणाचे धागेदोरे देशभरात पसरल्याची माहिती पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मेफेड्रोन तस्करी प्रकरणात गुंड वैभव उर्फ पिंट्या माने, हैदर शेख, अजय करोसिया यांना सोमवारी गुन्हे शाखेने अटक केली. त्यांच्याकडून साडेतीन कोटी रुपयांचे मेफेड्रोन जप्त करण्यात आले. शेखने विश्रांतवाडीतील मिठाच्या गोदामात मेफेड्रोन लपविल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांच्या पथकाने तेथे छापा टाकला. विश्रांतवाडीतील गोदामातून ५५ किलो मेफेड्रोन जप्त करण्यात आले. आरोपी माने, शेख, करोसिया यांची चौकशी करण्यात आली तेव्हा पुणे-सोलापूर महामार्गावर असलेल्या कुरकुंभ एमआयडीसीतील अर्थकेम लॅबोरटीज कंपनीत मेफेड्रोन तयार केले जात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने मंगळवारी तेथे छापा टाकून ११०० कोटी रुपयांचे ६०० किलो मेफेड्रोन जप्त केले. अधिक तपास सुरू आहे.

---

राज्यसभा निवडणूक

## महाराष्ट्रातून सर्व उमेदवार बिनविरोध

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यसभा निवडणुकीमध्ये महाराष्ट्रातील सहा जागांसाठी चार पक्षांकडून तेवढेच उमेदवारी अर्ज आले होते. निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची २१ शेवटची तारीख होती. अखेरच्या मुदतीपर्यंत एकाही उमेदवाराने नाव मागे न घेतल्याने सर्व सहा उमेदवार बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करण्यात आले.

भाजपचे अशोक चव्हाण, मेधा कुलकर्णी आणि डॉ. अजित गोपछडे; शिवसेनेचे मिलिंद देवरा, राष्ट्रवादीचे प्रफुल्ल पटेल, तर काँग्रेसचे चंद्रकांत हंडोरे यांची बिनविरोध निवड झाली आहे. दरम्यान, राजस्थान, गुजरात, मध्य प्रदेश आणि बिहारमधील उमेदवारांचीही बिनविरोध निवड झाली आहे.

---

## निवडक

### आयपीएलचा यंदाचा हंगाम २२ मार्चपासून रंगणार

**नवी दिल्ली** : आयपीएलच्या १७व्या हंगामाचे सुरुवातीचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. यंदा १० संघांसह जगातील ही सर्वांत मोठी लीग २२ मार्चपासून खेळली जाणार आहे. लीगचे अध्यक्ष अरुण धुमाळ यांनी मंगळवारी (दि.२०) ही माहिती दिली. देशात लोकसभा निवडणुका होणार आहेत. त्यामुळे या निवडणुकीच्या तारखा पाहून आयपीएलचे पुढील वेळापत्रक घोषित केले जाणार आहे.

### लोकप्रिय अभिनेते ऋतुराज सिंह यांचे निधन

**मुंबई** : टीव्ही व चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाने प्रेक्षकांची मने जिंकणारे लोकप्रिय अभिनेते ऋतुराज सिंह यांचे सोमवारी रात्री निधन झाले. हृदय बंद पडल्यामुळे (कार्डियाक अरेस्ट) त्यांची प्राणज्योत मालवली. ते ५९ वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने मनोरंजनसृष्टीवर शोककळा पसरली आहे.



---

## खालापूर ढेकू येथे भव्य हळदीकुंकू समारंभ



▪ **भाजप नेते, पदाधिकाऱ्यांची लाभली उपस्थिती**

▪ **नरेश पाटील यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक**

**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

शिवजयंतीनिमित्ताने ढेकू येथे हळदीकुंकू कार्यक्रमासाठी हजारोंच्या संख्येने आलेल्या या भगिनी म्हणजेच नरेश पाटील यांच्यावर असलेले प्रेम व त्यांनी केलेल्या सामाजिक कार्याची पावती आहे, असे गौरवोद्गार भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी काढले. ते नरेशदादा युवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित हळदीकुंकू समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

खालापूर तालुक्यातील ढेकू येथे गेली बारा वर्षे नरेशदादा पाटील युवा प्रतिष्ठानच्या वतीने शिवजयंतीच्या निमित्ताने विविध समाजोपयोगी कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. यंदाही प्रतिष्ठान आणि भारतीय जनता पक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील महिलांसाठी हळदीकुंकू समारंभाचे आयोजन सोमवारी (दि.१९) करण्यात आले होते. या वेळी विशेष आकर्षण म्हणजे सिनेअभिनेते क्रांती नाना मळेगावकर यांचा खेळ रंगला पैठणीचा हा स्पर्धात्मक कार्यक्रम घेण्यात आला.

या समारंभास माजी आमदार सुरेश लाड, भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष माजी आमदार धैर्यशील पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, कर्जत खालापूर विधानसभा निवडणूक प्रमुख किरण ठाकरे, महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष वर्षा भोसले, सदस्य संध्या शारबिंद्रे, भाजप जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, खालापूर शहर अध्यक्ष दीपक जगताप, विठ्ठल मोरे, सनी यादव, प्रसाद पाटील, शरद लाड, राजेश लाड, संदीप पाटील, प्रकाश पाटील, विनोद खवले, सुनील सुखदरे, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष सुजाता दळवी, खोपोली शहर अध्यक्ष शोभा काटे, अनंता पाटील, काशिनाथ पार्टे, हरिभाऊ जाधव, रमेश रेटरेकर, हेमंत नांदे, अश्विनी अत्रे, राखी गणेशकर, निकिता हेलंडे, श्वेता मनवे, रसिका शेटे, स्नेहल सावंत, विनिता घुमरे, विकास रसाळ, भालचंद्र पाटील, प्रिती पाटील, अश्विनी माळी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. **(पान २ वर..)**

---

## कर्जतमध्ये टेम्पोने चिरडलेल्या तिसऱ्या जैन महिलेचाही मृत्यू






**कर्जत : प्रतिनिधी**

खोपोलीहून कर्जतला आलेल्या जैन साध्वी व त्यांच्याबरोबर असलेल्या जैन महिला सोमवारी पहाटे कर्जतहून नेरळकडे पायी चालत जात असताना मागून येणाऱ्या टेम्पोने त्यांना जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात जैन साध्वीसह अन्य एक जैन महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर एक भगिनी गंभीर जखमी झाली होती. जखमी झालेल्या महिलेला पुढील उपचारासाठी पनवेल येथे नेण्यात आले होते. त्या महिलेचे मंगळवारी (दि.२०) उपचारादरम्यान निधन झाले.

चार जैन साध्वी आणि आठ जैन महिला कर्जत-कल्याण मार्गावरून चालत जात होत्या. या वेळी वांजळे गावानजीक मागून भरधाव येणाऱ्या दुधाच्या टेम्पोने दिलेल्या धडकेत साध्वी मौलिकपूर्णा श्रीजी (वय ५१) तसेच लता हिंगड (वय ३५) यांचा जागीच मृत्यू झाला, तर दीपा उर्फ दिवालीबेन राणावत-ओसवाल (वय ५२) या गंभीर जखमी झाल्या होत्या. जखमी झालेल्या ओसवाल यांना पुढील उपचारासाठी तातडीने पनवेल येथील गांधी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले, मात्र उपचारादरम्यान मंगळवारी दुपारी त्यांचे निधन झाल्याचे डॉक्टरांनी जाहीर केले. त्यामुळे हळहळ व्यक्त होत आहे.

# राज्यात आणखी १३ नवी कारागृहे उभारणार

## कैद्यांची संख्या वाढल्याने निर्णय




**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यात दिवसेंदिवस गुन्हेगारी वाढत असून कारागृहात असणाऱ्या गुन्हेगारांची संख्याही वाढत आहे, मात्र त्या तुलनेत कारागृहांची संख्या कमी आहे. त्यामुळे आता राज्यात जवळपास १५ हजार कैद्यांना सामावून घेण्याच्या क्षमतेचे आधुनिक पद्धतीचे १३ नवीन कारागृह तयार करण्यात येत आहे.

सध्या राज्यात ६० कारागृहे असून त्यात २६ हजार ३७७ बंदिवान ठेवता येतील एवढी क्षमता आहे, मात्र कारागृहात क्षमतेपेक्षा जवळपास दीडपट म्हणजेच ४० हजार ४८५ कैदी बंदिस्त आहेत. गेल्या अनेक दिवसांपासून कारागृहात कैद्यांमध्ये मारामारी किंवा टोळीयुद्ध होत असल्याच्या घटना घडत आहेत. एकमेकांवर प्राणघातक हल्ला करणे किंवा खून करण्यापर्यंत घटना घडत आहेत, तसेच कारागृहातील पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांवरही कैदी हल्ले करीत असल्याच्या अनेक घटना राज्यभरातून समोर आल्या आहेत.

या घटना टाळण्यासाठी नवीन कारागृहाची निर्मिती करण्याचा प्रस्ताव राज्य कारागृह विभागाने गृहमंत्रालयाला दिला होता. त्यावर लगेच अंमलबजावणी करीत जवळपास नवीन १३ कारागृहे निर्माण करण्याचा प्रस्ताव मंजुरीच्या प्रक्रियेत आहे. सध्या राज्यात नऊ मध्यवर्ती कारागृहे असून त्यात कल्याण आणि लातूर मध्यवर्ती कारागृहाची भर पडणार आहे.

कल्याण आणि लातूर दोन्ही जिल्हा कारागृह होते, परंतु आता मध्यवर्ती कारागृहात रूपांतरित करण्यात आले असून लवकरच उद्घाटन करण्यात येणार आहे.

### येथे होणार कारागृहे

हिंगोली, ठाणे, गोंदिया, जळगाव-भुसावळ, पालघर, तुर्भे, येरवरडा, नगर-नारायणडोह, नांदेड, अलिबाग, बीड, सातारा आणि सांगली या जिल्ह्यात नव्याने कारागृह उभारण्यात येणार आहेत. शासनाकडून जमीन अधिगृहित करण्यात आली असून लवकरच नव्या कारागृहाच्या निर्माणकार्याला सुरुवात होणार आहे. वरील सर्व कारागृहे आधुनिक पद्धतीची असतील. त्यामुळे कैदी पळून जाणे किंवा मारामारी करण्याच्या घटनांवर नियंत्रण येईल.

# वाचनयुक्ती चळवळ लोकाभिमुख करावी -प्रा.डॉ. नरेंद्र पाठक



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

वाचनयुक्ती चळवळ लोकाभिमुख करण्यासाठी राज्य शासनाचे ग्रंथोत्सव कार्यक्रम उपयुक्त आहेत, असे मत प्रा. डॉ.नरेंद्र पाठक यांनी व्यक्त केले.

ठाणे जिल्हा ग्रंथोत्सवाचे उद्घाटन साहित्य अकादमी सदस्य प्रा. डॉ. नरेंद्र पाठक यांच्या हस्ते झाले. राज्य सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत ग्रंथालय संचालनालय व जिल्हा ग्रंथालय, अधिकारी कार्यालय ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने साहित्य मंदिर सभागृह, प्रा. माणिकराव कीर्तने वाचनालय, वाशी येथे ग्रंथोत्सवाचे आयोजन करण्यात आले. ग्रंथोत्सवाच्या उद्घाटनापूर्वी वाशी शहरात ग्रंथ दिंडीचे आयोजन करण्यात आले होते.

या वेळी मुंबई विभागाच्या सहाय्यक ग्रंथालय संचालक मंजुषा साळवे, कोकण विभागाचे माहिती उपसंचालक डॉ. गणेश मुळे, प्रा. माणीकराव कीर्तने वाचनालय, साहित्य मंदिर वाशीचे अध्यक्ष सुभाष कुळकर्णी, साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष तथा कवी अरुण म्हात्रे, जिल्हा ग्रंथालय ठाण्याचे अधिकारी प्रशांत पाटील आणि नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते.

जिल्हा ग्रंथालय अधिकारी प्रशांत पाटील यांनी ग्रंथोत्सवाचे महत्त्व सांगून माणसाची विचारधारा वाचनातून निर्माण होत असल्याबाबत विविध विचारवंतांची उदाहरणे सांगितली. यानंतर साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष तथा प्रसिद्ध कवी अरुण म्हात्रे यांनी वाचनाचे महत्त्व उपस्थित विद्यार्थ्यांना पटवून दिले.

# आरोग्य शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील सिटिझन्स युनिटी फोरम व बिरमोळे मेडिकल फाउंडेशन ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने बिरमोळे हॉस्पिटल येथे आयोजित केलेल्या आरोग्य शिबिरात शंभरहून अधिक रुग्णांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

या शिबिरामध्ये क्ष किरण तपासणी, हृदयस्पंदन आलेख, रक्ताच्या, दमा आजाराच्या, अस्थि घनतेच्या व कंठग्रंथींच्या विविध चाचण्या करण्यात आल्या. या शिबिरामध्ये पनवेलमधील नामांकित डॉक्टर्स व बिरमोळे हॉस्पिटल मधील तज्ज्ञ डॉक्टरांनी सहभाग नोंदवला. हृदयरोग, दमा, मधुमेह, कंठ ग्रंथीत्रस्त अशा अनेक आजारांवर डॉ. समीर सहस्त्रबुद्धे, डॉ. केजरीवाल, डॉ. मिताली पाटील, डॉ. ऋतुजा सादिगले, डॉ. गिरीश देशपांडे अशा विविध आजार उपचारात पारंगत असलेल्या निपुण डॉक्टरांनी शिबिरार्थींना यथायोग्य मार्गदर्शन केले, तसेच प्रणव कोलगे व त्यांच्या सहकाऱ्यांनी नेत्र तपासणीनंतर नंबरचे चष्मे बनवून दिले.

कफचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच बिरमोळे हॉस्पिटलमधील प्राजक्ता वातारे, कांचन पुजारी, केतकी बावने व सर्व कर्मचारीवर्ग यांनी शिबिराच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले. दरवर्षी फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या या शिबिरास पनवेलच्या नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत असतो.

# ठाणे येथे २९ फेब्रुवारी ते १ मार्चला होणार कोकण विभागस्तरीय नमो महारोजगार मेळावा

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागामार्फत हायलँड ग्राऊंड, ढोकाळी, माजीवाडा, ठाणे (पश्चिम) येथे कोकण विभागांतर्गत नमो महारोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा २९ फेब्रुवारी ते १ मार्च रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत होईल.

या मेळाव्यात नोकरी इच्छुक युवक-युवतींनी मुलाखतीसाठी आणि महाएक्सपोमध्ये स्टार्टअप्स, इनवेस्टर्स व इनकुबेटर्स या सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नावीन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले आहे.

कौशल्य विकास मंत्री लोढा म्हणाले की, या मेळाव्यात नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. https://qr-codes.io/gdhSNd किंवा www.rojgar.mahaswayam.gov.in या लिंकवर उमेदवार नोंदणी व नोकरीकरिता अर्ज करून प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहू शकतात. एकापेक्षा अधिक नोकरीसाठीदेखील अर्ज करता येईल, मुलाखती देता येतील. रोजगार मेळाव्यात सहभागी होणाऱ्या उमेदवारांनी मेळाव्याच्या अगोदर ही नोंदणी करणे आवश्यक आहे. जे उमेदवार मेळाव्याच्या अगोदर नाव नोंदणी करतील त्याच उमेदवारांच्या मेळाव्याच्या दिवशी मुलाखती होणार आहेत. या माध्यमातून दोन लाख युवक आणि युवतींना रोजगार देण्याचा संकल्प करण्यात आला आहे.

कोकण विभागातंर्गत ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, मुंबई उपनगर, मुंबई शहर जिल्ह्यातील सर्व शासकीय, निमशासकीय, खाजगी आस्थापनांनी https://rojgar.mahaswayam.gov.in या वेब पोर्टलवर उद्योजक नोंदणी करून रिक्त पदे अधिसूचित/जाहीर करणे आवश्यक आहे. याबाबत काही अडचण असल्यास संबंधित जिल्ह्यातील नोडल अधिकारी यांच्याशी किं हैवा १८०० १२० ८०४० या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन करण्यात येत आहे.

# आजपासून बारावीची परीक्षा

**पुणे : प्रतिनिधी**

राज्य मंडळातर्फे राज्यातील बारावीची लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्च या कालावधीत होत आहे. एकूण १५ लाख १३ हजार ९०९ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली आहे. परीक्षेदरम्यान गैरप्रकार टाळण्यासाठी भरारी पथके, प्रश्नपत्रिकेची पाकिटे ताब्यात घेतल्यापासून प्रश्नपत्रिका वितरित करेपर्यंतचे चित्रीकरण मोबाईलमध्ये करण्यात येणार आहे तसेच प्रश्नपत्रिकांच्या वाहतुकीवेळी जीपीएस प्रणालीचा वापर केला जाणार आहे.

विज्ञान शाखेसाठी सात लाख ६० हजार ४६, कला शाखेसाठी तीन लाख ८१ हजार ९८२, वाणिज्य शाखेसाठी तीन लाख २९ हजार ९०५, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी ३८ हजार २२६, आयटीआयसाठी चार हजार ७५० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

परीक्षेमध्ये होणारे गैरप्रकार रोखण्यासाठी शिक्षण मंडळाने विविध उपाययोजना केल्या आहेत. यंदा प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी पाच भरारी पथके ठेवण्यात आली आहेत. यामध्ये प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण, डायट, योजना आणि उपशिक्षणाधिकारी यांच्या भरारी पथकांचा समावेश असेल. याशिवाय जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील महसुली विभागाचे भरारी पथकही परीक्षा केंद्रांवर नजर ठेवून राहणार आहेत. याशिवाय भ्रमनध्वनी व अन्य तांत्रिक उपकरणांना परीक्षा केंद्रावर बंदी आहे.

# बसच्या धडकेत एकाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील बारापाडा येथील शिव प्युअर व्हेज हॉटेल परिसरात उभी असलेली लक्झरी बसचालक बस पाठीमागे घेत असताना मागे उभा असलेल्या एका व्यक्तीच्या अंगावरून गेल्याने त्यात त्याचा मृत्यू झाला आहे. या अपघातात टिक्कु हरी प्रसाद (वय ३२, रा. बारापाडा) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. लक्झरी बस (एमएच ४६ एबी ०६६९) ह्या लक्झरी बस वरील चालकाची बसच्या मागे उभा असलेला टिक्कु हरी प्रसादला ठोकर बसली. यात त्याच्या अंगावरून बसचे पाठीमागील टायर गेल्याने छातीस व डोक्यास गंभीर दुखापती होऊन त्याचा मृत्यू झाला. बसचालकावर पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# खालापुरात शिवजयंतीनिमित्त वक्तृत्व स्पर्धा उत्साहात

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ढेकू येथे नरेशदादा पाटील युवा प्रतिष्ठान आणि भाजप यांच्या संयुक्त विद्यमाने शिवजयंतीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. हभप रामदास महाराज पाटील आणि माजी जि. प. सदस्य नरेश पाटील यांच्या हस्ते विजयी स्पर्धकांना पारितोषिक देण्यात आले.

ढेकू येथे गेली १२ वर्षे नरेशदादा पाटील युवा प्रतिष्ठानकडून शिवजयंती मोठ्या उत्साहात सजारी केली जाते. या वेळी अनेक सांस्कृतिक कार्यक्रम राबविले जातात. यावर्षीही अनेक कार्यक्रमांचे आयोजन केले असून मात्र विशेष आकर्षण ठरले ते विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेल्या वक्तृत्व स्पर्धा. स्पर्धेत प्रथम क्रमांक आरोही चौधरी, द्वितीय क्रमांक अक्षरा गावडे तर तृतीय क्रमांक जीवन पाटील यांना पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.

या वेळी संदीप पाटील, अजित देशमुख, विनोद खवले, प्रकाश पाटील, सनी यादव, प्रसाद पाटील, सुनील सुखदरे, पांडुरंग कदम, दत्ता पुरी, भाऊ गायकवाड, राकेश जाधव, अमर मानकावळे, अमोल देशमुख यांसह नागरिक उपस्थित होते.



# फुंडे हायस्कूलमध्ये शिवरायांना मानवंदना



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे तुकाराम हरी वाजेकर विद्यालय फुंडे येथे सोमवारी (दि. १९) शिवजयंती सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. इ. सातवी ब च्या वर्गाने वर्गशिक्षक प्रशांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे नियोजन केले होते.

विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्य एम.जी.म्हात्रे, पर्यवेक्षक एस.जी. म्हात्रे, ज्युनिअर कॉलेज प्रमुख व्ही. के. कुटे आणि सर्व सेवक वृंद यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे पूजन करण्यात आले. सुमित बुरुंगले या विद्यार्थ्याने शिवगर्जना दिली.

या वेळी विद्यार्थिनींनी महाराष्ट्र गीताचे गायन केले तर नचिकेत म्हात्रे या विद्यार्थ्याने 'शूर आम्ही सरदार' हे गीत सादर केले. विराज दुपडे या विद्यार्थ्याने देखील शिवगीत सादर केले. यानंतर विद्यार्थी भाषणात प्रज्ञा शिंदे, धीरज मोरे, साक्षी करांडे, कौस्तुभ पाटील, बंडू लवटे, श्रेयस मंडले, शांती चदाना या विद्यार्थ्यांनी शिवरायांची थोरवी सांगितली.

एच. एन. पाटील यांनी 'रायगड किल्ला महाराष्ट्राची शान' या गीताचे गायन केले, तर दिगंबर पाटील, एस. डी. म्हात्रे यांनी शिवरायांचे विचार सांगून ते विचार सर्व विद्यार्थ्यांनी आचरणात आणावे, गड- किल्ल्यांचे संवर्धन करावे असे आवाहन केले. प्रज्ञा शिंदे हिने केलेल्या भाषणासाठी ज्येष्ठ शिक्षिका साधना पाटील यांनी तिचे कौतुक केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरी बुरंगे तर शेवटी प्रशांत पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

पान १ वरुन

## खालापूर ढेकू येथे भव्य हळदीकुंकू समारंभ

आपले विचार मांडताना आमदार प्रशांत ठाकूर पुढे म्हणाले की, आज प्रत्येक गावात उपक्रम आहेत. असे असतानासुद्धा हजारोच्या संख्येने या महिला भगिनी येथे आल्या आहेत याचा अर्थ नरेश पाटील यांच्यावर असलेले त्यांचे प्रेम. अनेक वर्षे नरेश पाटील शिवजयंतीनिमित्ताने विविध कार्यक्रम घेत आले आहेत. प्रत्येक वेळी त्यांनी महिलांचा आदर करीत हळदीकुंकू समारंभ घेतला आहे, त्यांच्या समस्या आपुलकीने सोडविल्या आहेत. त्यामुळे महिला भगिनींनी रेकॉर्डब्रेक गर्दी येथे केली आहे आणि हीच उपस्थिती भविष्यातील काही सत्य सांगत आहे.

माजी आमदार सुरेश लाड यांनीही नरेश पाटील यांनी येथील जनतेसाठी खूप काही केले आहे आणि त्याचीच पोचपावती त्यांना भविष्यात मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

खेळ रंगला पैठणी कार्यक्रमात प्रथम क्रमांक विभुती सौरव दहिफळे साजगाव (एलईडी टीव्ही व पैठणी), द्वितीय क्रमांक सारिका श्रीकांत शेडगे माडपवाडी (गॅस शेगडी), तृतीय क्रमांक नीता रितेश येसरे तांबाटी (कुलर), चतुर्थ क्रमांक काजल अशोक भामरे वावोशी (मिक्सर) आणि पाचवा क्रमांक मोनाली रोहिदास पाटील ढेकू (कुकर) यांनी पटकाविला. या सर्वांना गौरविण्यात आले.




# सरसगडावरील तटबंदीत दडलेल्या गुप्त दरवाजाचा शोध

**पाली : प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दुर्गवेध युवा मराठा फाऊंडेशन मुंबईच्या वतीने पालीतील सरसगडावर शिवजन्मोत्सव सोहळा झाला. या कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण हे दुर्गवेध परिवाराने गेल्या वर्षभर अखंड मेहनत घेऊन दगडांच्या ढिगाऱ्याखाली बुजलेला तटबंदीत असलेला गुप्त दरवाजा शोधला आहे. त्याचा लोकार्पण सोहळा मान्यवरांच्या हस्ते झाला.

मागील कित्येक दशके हा दरवाजा त्यावर कोसळलेल्या जवळपास तीन टन दगड आणि मातीने बुजून गेला होता. 'सरसगडाला सरस करायचंय' या त्यांच्या उक्तीला सार्थ करत परिवाराने हा दरवाजा मोकळा केला. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून पाली नगराध्यक्ष प्रणाली शेळके, नगरसेवक जुईली ठोंबरे, पोलीस निरीक्षक सरिता चव्हाण, सुधागड तालुका समन्वय समिती सदस्य सुरज शेळके, भरत गोळे, पुरातत्वीय अभ्यासक प्रणित, दुर्गवीर प्रतिष्ठानचे सुमित जाधव व त्यांचे दुर्गसेवक, शिवस्मरण प्रतिष्ठान यांच्यासह पाली, तळई परिसरातील नागरिक उपस्थित होते.



प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते गुप्त दरवाजा उजेडात आणण्याच्या कामगिरीवर सहभागी सर्व मावळ्यांचा सत्कार करण्यात आला, तसेच सर्व पाहुण्यांना इतिहासाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने छत्रपती शिवरायांच्या अस्सल चित्रांचे माहिती व दर्शन घडविणारे केतन पुरी लिखित मऱ्हाठा पातशहा हे संशोधनपर ऐतिहासिक पुस्तक भेट म्हणून देण्यात आले.

**हा दरवाजा आमच्या हातून मोकळा होणे म्हणजे सरसगडावर गेल्या आठ वर्षांपासून आम्ही अविरत संवर्धनाचे कार्य करताना छत्रपती शिवराय यांनी कार्याची दिलेली पोचपावतीच आहे.**
**-नितेश देसाई, दुर्गवेध युवा मराठा फाऊंडेशन, संस्थापक अध्यक्ष**

## दुखवटा

### माजी सैनिक गोविंद चितळे

**मोहोपाडा** : पाताळगंगा परिसरातील चावंढोली गावातील माजी सैनिक गोविंद जोमा चितळे यांचे नुकतेच निधन झाले. माजी सैनिकांद्वारे त्यांना पुष्पचक्र अर्पण करून मानवंदना देण्यात आली. १९६१ साली भारतीय सैनिक दलात भरती झालेले गोविंद चितळे हे फर्स्ट महार रेजिमेंट बटालियनचे सैनिक होते. त्यांनी संग्राम मेडल, सैन्य सेवा मेडल, सामान्य सेवा मेडल, रक्षा मेडल, समार सेवा स्टार मेडल, नवं वर्ष दीर्घ सेवा मेडल, पच्चीसवी स्वतंत्रता जयंती मेडल अशी पदके प्राप्त केली आहेत. त्यांच्या पश्चात एक मुलगा, एक मुलगी, दोन नातू व एक नात असा परिवार आहे.

# बेशिस्त वाहनचालकांवर धडक कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील वडाळे तलाव परिसरात रात्रीच्या वेळी अनेक दुचाकीस्वार कर्कश असे सायलेंन्सरद्वारे आवाज काढून गाड्या चालवितात त्याचप्रमाणे वाढदिवस व इतर कार्यक्रम सार्वजनिक ठिकाणी साजरे करताना चार चाकी गाड्यांमध्ये स्पीकरवर मोठ मोठ्याने गाणी लावतात, अशांवर पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने कारवाई केली आहे.

याबाबतच्या अनेक तक्रारी पनवेल शहर पोलीस ठाण्यात परिसरातील नागरिकांनी केल्या होत्या. त्याचप्रमाणे अशा घटनांमुळे कायदा, सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत होता व या कर्कश आवाजाचा त्रास प्रामुख्याने ज्येष्ठ नागरिक व रुग्णांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना होत होता. याबाबत वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक जुईकर व गुन्हे शाखेच्या पथकाने रात्रीच्या वेळी त्या ठिकाणी गस्त घालून अशा प्रकारे कर्कश आवाजाने मोटरसायकल चालविणाऱ्या दोन मोटार सायकलींवर त्याचप्रमाणे एका चार चाकी वाहनांना ताब्यात घेतले.

या वाहनांवर पनवेल शहर पोलीस ठाण्यात दंडात्मक कारवाई करून याबाबतची माहिती पनवेल वाहतूक शाखेला पुढील कारवाईकरिता दिली आहे. यापुढेसुद्धा अशा प्रकारे कारवाया पनवेल शहर परिसरात सुरूच राहणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी दिली.

## पनवेलच्या वडाळे परिसरात बडगा





# घारापुरी येथे मुर्तींची प्रतिष्ठापना
## आमदार महेश बालदी यांची उपस्थिती

**उरण : वार्ताहर**



बालमित्र मंडळ घारापुरी (राज बंदर) यांच्या वतीने सोमवारी (दि. १९) रोजी श्री. मरूआई देवी, गणपती व राधा कृष्ण मूर्तींची स्थापना व प्राणप्रतिष्ठा आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत सोहळा झाला.

या वेळी आमदार महेश बालदी, माजी उपनगराध्यक्ष जयवीन कोळी, उरण तालुका भाजप अध्यक्ष तथा माजी नगरसेवक रवी भोईर, उरण शहर भाजप अध्यक्ष तथा माजी नगरसेवक कौशिक शाह, माजी नगरसेवक राजेश ठाकूर, शेखर पडते, घारापुरी ग्रामपंचायत माजी सरपंच राजेंद्र पडते, घारापुरी ग्रामपंचायत माजी सरपंच सुनील पडते, हितेश शाह, मनन पटेल, मनोहर सहतीया, संजय म्हात्रे, चाणजे ग्रुप ग्रामपंचायत माजी सरपंच जितेंद्र घरत शैलेश म्हात्रे, अजय म्हात्रे, सुदर्शन कोळी, प्रवीण कोळी, अविनाश मढवी, राकेश कोळी, प्रदीप म्हात्रे, लक्ष्मण पाटील, कल्पना कोळी, जयश्री कडू, आशा भोईर, उद्योगपती यशवंत म्हात्रे, उद्योगपती बळीराम भोईर, प्रेमनाथ मढवी, शैलेश पोतदार, मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

## निवडक



### कोंडले येथे शिवजयंती उत्साहात

**पनवेल :** तालुक्यातील कोंडले येथील आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती सोमवारी (दि. १९) कोंडले येथे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शिवाजी महाराजांच्या पूर्णाकृती फोटोला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. मिरवणूका काढण्यात आल्या. त्यानंतर सांस्कृतिक कार्यक्रम व बक्षीस समारंभ आयोजित करण्यात आला होता. या वेळी कोंडले गावातील नागरिक महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती




**नवी मुंबई :** मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून कोंकण भवनात त्यांची जयंती साजरी करण्यात आली. या वेळी महसूल आणि इतर विभागाचे अधिकरी तसेच कर्मचारी उपस्थित होते. बाळशास्त्री जांभेकरांनी ६ जानेवारी १८३२ रोजी दर्पण या नावने पहिले मराठी वत्तपत्र सुरू करून मराठी वृत्तपत्रसृष्टीचा पाया रचला. बाळशास्त्री जांभेकरांची पत्रकारीता समाज प्रबोधन व लोकशिक्षणाचे ज्ञान देणारे विद्यापीठ होते. विधवा पुनर्विवाहाची चळवळ त्यांच्या लिखाणामुळे उभी राहिली.

### दर्पणकार जांभेकरांना अभिवादन

**पनवेल :** मराठी वृत्तपत्र सृष्टीचे जनक, आद्य पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त पनवेल महापालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त कैलास गावडे, लेखाधिकारी संग्राम व्हारेकाटे, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, उपमुख्य लेखा परिक्षक संदीप खुरपे, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख दशरथ भंडारी, जनसंपर्क अधिकारी वर्षा कुलकर्णी, महापालिका कर्मचारी उपस्थित होते.



# 'माझी वसुंधरा' अंतर्गत महाविद्यालयांशी पनवेल मनपाचा करार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियान अंतर्गत पर्यावरणविषयक विविध कार्यक्रम राबविण्यासाठी आयुक्त श्री. गणेश देशमुख यांच्या सूचनेनूसार महापालिका कार्यक्षेत्रातील आठ महाविद्यालयांशी महापालिकेने आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये झालेल्या कार्यक्रमांतर्गत नुकताच सामंजस्य करार केला आहे. या सामंजस्य करारामुळे माझी वसुंधरांतर्गत राबविण्यात येणारे पर्यावरणविषयक जनजागृतीचे कार्यक्रम नागरिकांपर्यंत पोहचिविणे शक्य होणार आहे.




पर्यावरण विभाग उपायुक्त डॉ. वैभव विधाते, सहाय्यक आयुक्त स्वरूप खारगे, पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, आठ महाविद्यालयाचे प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पनवेल महापालिकेच्या वतीने माझी वसुंधरा अंतर्गत नागरिकांमध्ये पर्यावरणाचा आदर वाढविणे, नागरिकांमध्ये पर्यावरणविषयक प्रश्नांबद्दल जागृती निर्माण करण्याच्या दृष्टीने विविध कार्यक्रम राबविण्यात येत असतात. विद्यार्थी हे भविष्यातील नागरिक असतात हे लक्षात घेऊन पर्यावरणीय साक्षरतेला प्रोत्साहन देण्याच्या कामामध्ये त्यांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने हा सामंजस्य करार महत्वचा ठरणार आहे.पर्यावरण संवर्धन आणि जागरुकता, हवामान बदल साक्षरता, पर्यावरण शिक्षण इत्यादी क्षेत्रात महापालिका करत असलेल्या कामामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने महापालिकेने पालिका कार्यक्षेत्रातील आठ महाविद्यालयाशी सामंजस्य करार केला आहे.

या सामंजस्य करारामुळे पनवेल महापालिकेस महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सहकार्यातून पर्यावरणविषयक जनजागृतीचे विविध कार्यक्रम राबविणे सोपे जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने इको फ्रेंडली जीवनशैलीला प्रोत्साहन देण्यासाठी सेमिनार आणि कार्यशाळा आयोजित करणे, शासनाद्वारे राबविण्यात येणाऱ्या पर्यावरण संवर्धनाविषयी विविध अभ्यासक्रम शिकण्याच्या विद्यार्थ्यांना संधी उपलब्ध करून देणे, ऊर्जा संवर्धन, मृदा संवर्धन, जलसंधारण इ. यांसारख्या विषयांवर काम करण्यासाठी महापालिकेस सहकार्य करणे अशा विविध बाबींचा समावेश या सामंजस्य करारांतर्गत करण्यात आला आहे. या करारामुळे महापालिकेस पर्यावरणीय समस्यांबद्दल जागरूकता आणि पर्यावरणीय साक्षरतेला प्रोत्साहन देणे सोपे जाणार आहे.

या वेळी माझी वसुंधरा अंतर्गत शाळा व महाविद्यालयांमध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमामध्ये सहकार्य करणाऱ्या एनएसएस विद्यार्थ्यांना आयुक्त गणेश देशमुख यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक पर्यावरण विभाग उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी केले.

**करार करण्यात आलेली महाविद्यालये**

१. पिल्लई कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स
२. चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज
३. पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरींग
४. सरस्वती कॉलेज ऑफ इंजिनिअरींग
५. आयटीएम आयएचएस कॉलेज ऑफ नर्सिंग
६. आयटीएम स्कील्स युनिव्हर्सिटी
७. रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय खारघर
८. श्री.बापूसाहेब डी.डी. विसपुते कॉलेज ऑफ एज्युकेशन

## वक्तृत्व कौशल्याचे कौतुक



**पनवेल :** छत्रपती शिवाजी महाराज अश्वारूढ पुतळा उभारणी आणि सुशोभीकरण समिती तसेच छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समिती गव्हाण विभागाच्या वतीने भव्य शिवजयंती सोहळा सोमवारी उत्साहात साजरा झाला. या वेळी छत्रपती शिवाजी विद्यालयातील सहावीमधील स्मित कुंदन मोकल आणि पहिलीमध्ये शिकणारी राही सम्राट देशमुख यांनी आपले वक्तृत्व कौशल्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्मित मोकलला पाच हजार आणि राही देशमुखला तीन हजार रुपये बक्षीस देऊन त्यांना प्रोत्साहित केले तसेच त्यांचे कौतुक केले.



**उरण : तालुक्यातील जासई गावात छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त पालखी मिरवणूक काढण्यात आली होती. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या ठिकाणी भेट देत पालखीचे दर्शन घेतले. या वेळी भाजप गाव अध्यक्ष सुनील घरत, ग्रामपंचायत सदस्य आनंद म्हात्रे, बळीराम घरत, भूषण म्हात्रे, चंद्रकांत पाटील, जतिन पाटील आदी उपस्थित होते.**

## कामोठ्यात रक्तदान शिबिर

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे शहर सार्वजनिक नवरात्रोत्सव मंडळ आयोजित शिवजयंती निमित्त आणि मंडळाचे संस्थापक स्व. तानाजी पाटील यांच्या स्मरणार्थ सोमवारी (दि. १९) आयोजित केलेल्या भव्य रक्तदान शिबिरास नागरिकांचा उत्स्पूर्त असा प्रतिसाद मिळाला. तब्बल १४० रक्तदात्यांनी रक्तदान शिबिरात आपला सहभाग नोंदविला.

या शिबिराचे उद्घाटन पनवेल महापालिके माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते झाले. तसेच माजी नगरसेवक विजय चिपळेकर व कामोठे उपाध्यक्ष शरद जगताप, समीर पाटील आणि त्याच्या सहकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

# सीकेटी महाविद्यालयात मानसिक आरोग्यावर कार्यशाळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज (स्वायत्त) येथे समुपदेशन कक्ष विभागातर्फे युवा मानसरंग प्रकल्पांतर्गत मानसिक आरोग्य कार्यशाळेचे शुक्रवारी (दि. १६)आयोजन करण्यात आले होते.




या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते, मानसोपचारतज्ञ डॉ. हमीद दाभोलकर, त्यांची टीम, तसेच स्किल मिल इंडिया प्रा. लिमिटेडचे फाऊंडर श्री. झहीर मिर्झा व त्यांची टिम तसेच, महाराष्ट्र राज्य विद्याशाखा विकास अकादमी (एम. एस.एफ.डी.ए.)च्या कार्यकर्त्या तोशिता तांडेल, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य सचिव मिलिंद देशमुख उपस्थित होते.

या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी पथनाट्ये सादर केली तसेच पोस्टर्स, आणि मानसिक जनजागृती करणारे स्टॉल्स लावले होते. युवा मानसरंग प्रकल्पाअंतर्गत मानसिक कार्यशाळेमध्ये सर्व विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला. एकंदर ३० स्टॉल्स ची मांडणी करण्यात होती. या मध्ये खाद्यपदार्थांचेही स्टॉल्स मांडण्यात आले होते. एकंदर कार्यक्रमात जवळपास २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

'भावनिक प्रथमोपचार घरच्या घरी' हे डॉ. हमीद दाभोलकर यांच्या पुस्तकाचे लोकार्पण महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, झहीर मिर्झा, मिलिंद देशमुख आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बी. डी. आघाव, सुक्ष्मजीवशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. निलेश वडनेरे यांनी केले.

डॉ. हमीद दाभोलकर यांनी त्यांच्या भाषणात असे नमूद केले की, युवा मानसरंग हा तरुणांमधील आत्महत्या थांबवण्यासाठीचा प्रकल्प आहे आणि त्याकरिता मुलांसाठी अत्यंत आवश्यक असलेले कॉउंसेलिंग सेल महाविद्यालयानी उपलब्ध करून दिलेले आहे. तसेच मुलांच्या सर्वांगीण विकासासाठीच्या सर्व सुविधा या महाविद्यालयामध्ये आहेत. पूर्ण महाराष्ट्रात एकूण सहा कॉलेजेसची हा प्रकल्प पुढे नेण्यासाठी निवड केली गेलेली आहे आणि त्यापैकी चांगू काना ठाकूर हे एक कॉलेज आहे. पूर्ण भारतामध्ये असे एकमेव हे कॉलेज आहे जिथे मानसिक आरोग्याची एवढी काळजी केली जाते व त्याला महत्त्व दिले जाते.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी प्रस्तावना सादर केली. झहीर मिर्झा व त्यांच्या टीमने कॉउंसेलिंग सेलच्या रूममध्ये मानसिक आरोग्याचा संदेश देणारी पोस्टर्स लावून रूमचे सुशोभिकरण केले आणि कॉउंसेलिंग रूम ला इमोशनल फर्स्ट एड असे नाव देऊन त्याचे उद्घाटन तोशिता तांडेल आणि डॉ. हमीद दाभोलकर यांनी केले. झहीर मिर्झा व डॉ. हमीद दाभोलकर यांनी https://myemotionalfirstaid.org या वेबसाईटवर जाऊन आपली मानसिक स्थिती आपण कशी पडताळून पाहू शकतो हे दाखवले.

कार्यशाळेत मुलांनी व्यसन, सोशल मीडिया व्यसन, पालक आणि नातेसंबंध, शिक्षण आणि त्याचे मानसिक आरोग्याशी असलेले नाते या विषयावर चार पथनाट्ये व पोस्टर्स उत्तम प्रकारे सादर केली आणि स्टॉल्सवरही मुलांची मानसिक आरोग्य विषयक स्कॅनिंग करून देणारी चाचणी ठेवली होती. जवळ जवळ ८० जणांनी या चाचणीचा लाभ घेतला होता. सहभागींना सर्टिफिकेट्स देण्यात आले.

कार्यक्रमासाठी कॉउंसेलिंग सेलच्या समुपदेशिका स्वाती परब, प्रा. डॉ. भाग्यश्री भोईर, प्रा. अनिकेत सोनसुरकर, प्रा. सुचित्रा गव्हाळे, प्रा. अनिल नक्ती, प्रा. करण कोळी आणि प्रा. प्रज्योती देसाई यांनी परिश्रम घेतले.

# महात्मा फुले महाविद्यालयात विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महात्मा फुले आर्ट सायन्स आणि कॉमर्स महाविद्यालय (एमपीएएससी) पनवेल व रायगड तायक्वांदो असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जवळपास दोन हजार विद्यार्थ्यांना स्वरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन एमपीएएससी कॉलेजचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. प्राचार्य ठाकूर आपल्या भाषणात म्हणाले की, सुभाष पाटील हे आपल्या कॉलेजचे माजी विद्यार्थी असून ते स्वतः कॉलेजसाठी दरवर्षी आपल्या विद्यार्थिनींना मोफत प्रशिक्षण देतात त्यांचे खूप मोठे योगदान आहे आपल्या कॉलेजच्या विद्यार्थिनींना टायकोंडो या खेळामध्ये राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर पदके मिळवून दिलेली आहेत खेलो इंडिया स्पर्धेसाठी आपल्या कॉलेजची विद्यार्थिनी निर्मिती दत्ता हिची निवड झाली आहे.

कॉलेजच्या विद्यार्थिनींना शारीरिक आणि मानसिक शक्तीला चालना देण्यासाठी तसेच कॉलेज आणि कोणत्याही परिस्थितीला तोंड देण्याचा उद्देशाने त्यांना स्वयंसेरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले. महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थिनींची सेड काढण्याचे प्रकार घडतात अनेकदा त्यांच्यावर वाईट प्रसंग ही वाढवतात अशी अनेक उदाहरणे सांगता येतील तेव्हा अशा प्रकारच्या घटनाही वारंवार घडतात महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राज्यात महिला सुरक्षित राहिल्या पाहिजेत विशेषतः कॉलेजच्या विद्यार्थिनींचे स्वसंरक्षणासाठी आत्मबल वाढले पाहिजे त्याचबरोबर मुलींनी गुन्हेगारी विरोधात लढण्यासाठी सक्षम व्हावे या उद्देशाने महात्मा फुले कॉलेज अंतर्गत असे उपक्रम राबविण्यात येतात.

प्रशिक्षण आंतरराष्ट्रीय पंच सातवी डिग्री व मुख्य प्रशिक्षक सुभाष पाटील यांचे सहकारी प्रभाकर भोईर राकेश जाधव तेजस माळी अक्षता भगत गौरी पाटील आणि सनी पासवान निर्मिती दत्ता इत्यादींचे मार्गदर्शन लाभले.

## संपादकीय

# ऐतिहासिक प्रतिज्ञापूर्ती

शब्द दिल्याप्रमाणे शिंदे-फडणवीस-पवार यांच्या सरकारने विधिमंडळाच्या विशेष अधिवेशनात मराठा आरक्षणाबाबतचा कायदा एकमताने मंजूर केला. एका प्रदीर्घ लढ्याचे चीज झाल्याचा तो क्षण होता. नव्या कायद्यानुसार मराठा समाजाला दहा टक्के स्वतंत्र आरक्षण मिळू शकणार आहे. हे आरक्षण मिळवून देण्यासाठी किमान चार लाख लोकांचे श्रम कारणी लागले आहेत. गेले काही महिने संपूर्ण सरकारी यंत्रणा अहोरात्र राबून या अध्यादेशाच्या पुर्ततेसाठी कार्यरत होती.

**रक्तातील शेवटच्या थेंबापर्यंत मराठा बांधवांना आरक्षण मिळवून देण्यासाठी लढेन, अशी प्रतिज्ञा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी छत्रपती शिवरायांच्या साक्षीने काही महिन्यांपूर्वी केली होती. मुख्यमंत्र्यांच्या या प्रतिज्ञेची बरीच कुचेष्टा समाजमाध्यमांवर झाली. टोमणे मारून समाधान मिळवणाऱ्या काही विरोधी नेत्यांना आपल्या टोमणे मारण्याच्या कलेचे प्रदर्शनदेखील करता आले, परंतु सरकार बदलले आहे आणि काळदेखील बदलला आहे हे विरोधकांच्या लक्षात आले नाही. लोकांच्या मनात स्थान मिळवणारा हा मुख्यमंत्री आणि त्याचे सरकार शब्दाला पक्के आहे याची खात्री आता त्यांना नक्की पटली असेल. मराठा आरक्षणासाठी आवश्यक असलेला मागासवर्ग आयोगाचा अहवाल हातात आल्यानंतर किंचितही वेळ न घालवता तो स्वीकारून विधिमंडळात पटलावर ठेवण्यात आला. माननीय राज्यपालांच्या स्वाक्षरीनंतर मंजूर विधेयकाचे रीतसर कायद्यात रुपांतर होईल. मागासवर्गीय आयोगाच्या अहवालानुसार राज्यात २८ टक्के लोकसंख्या मराठा समाजाची आहे, परंतु यापैकी ८४ टक्के मराठा समाज हा आर्थिकदृष्ट्या पिचलेला आणि सामाजिकदृष्ट्या मागास ठरतो. बव्हंशी मराठा बांधव हे शेती व्यवसायात असल्यामुळे त्यांची परिस्थिती हलाखीची आहे. राज्यात घडलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्यांपैकी सर्वाधिक आत्महत्या मराठा बांधवांच्या आहेत ही बाब बरेच काही सांगून जाते. सर्वार्थाने मागे राहिलेल्या बहुतांश मराठा समाजाला अन्य कुठल्याही प्रवर्गात ढकलणे अन्यायाचे ठरेल. त्यांना स्वतंत्र आरक्षणच दिले गेले पाहिजे असे आयोगाचे प्रतिपादन आहे. गेल्या दीडशे दिवसांमध्ये अत्यंत गतिमानतेने जे सर्वेक्षण झाले, त्यातील हे निष्कर्ष आहेत. हा सारा तपशील काटेकोर असून या वेळी देण्यात येणारे मराठा आरक्षण न्यायालयात नक्की टिकेल असा आत्मविश्वास मुख्यमंत्री शिंदे यांनी विधिमंडळात बोलताना व्यक्त केला. किंबहुना, तशी खात्रीच त्यांनी दिली. अर्थात मराठा आरक्षणाबाबतच्या या ऐतिहासिक निर्णयाचे सर्वत्र जल्लोषात स्वागत झाले, परंतु मराठा आरक्षणाच्या मुद्यावर उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांचे मात्र समाधान अजुन झालेले नाही. ओबीसी आरक्षणामध्ये मराठ्यांना समाविष्ट करून घ्यावे हा त्यांचा हट्ट चालूच राहिला आहे. 'सगेसोयरे' या शब्दावरूनही मध्यंतरी बरेच रणकंदन झाले होते. येत्या काही दिवसांतच त्याची उत्तरे मिळतील. मराठा आरक्षण प्रश्नी हरकती मागविण्यात आल्या होत्या. राज्यभरातून सुमारे सहा लाख हरकती प्राप्त झाल्या असून त्यांची छाननी चालू आहे. ही सारी कामे पूर्ण व्हावयास काही काळ जावा लागेल, तोपर्यंत तरी मराठा आंदोलक नेत्यांनी संयम ठेवायला हवा. नव्या आरक्षणानुसार मराठा समाजातील तरुणतरुणींना सरकारी नोकऱ्या, क्षेत्रीय कार्यालये, ग्रामपंचायती अशा ठिकाणी नोकऱ्यांमध्ये प्राधान्य मिळेल. खाजगी अथवा सरकारी शिक्षण क्षेत्रातदेखील आरक्षणाचा लाभ मिळेल. राजकीय आरक्षण मात्र मिळणार नाही. एका ऐतिहासिक लढ्याची फलश्रुती मंगळवारी विधिमंडळात प्रत्यक्ष अनुभवता आली. इतिहासात कायमस्वरुपी नोंदला जाणारा हा क्षण आहे.**

# जाणून घेऊया आदर्श आचारसंहिता म्हणजे काय?

लोकसभा निवडणुकीची घोषणा झाली की आदर्श आचारसंहिता लागू होईल. मग आदर्श आचारसंहिता हा शब्द तुमच्या कानावर पुढचे काही दिवस वारंवार पडेल...तो प्रत्येक निवडणुकीत पडतोच. पण आदर्श आचारसंहिता म्हणजे नेमकं काय? लोकसभा, विधानसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा होताच देशभरात आचारसंहिता लागू होते, पण आचारसंहिता म्हणजे नेमकं काय? असा प्रश्न अनेकांना पडतो. भारतीय घटनेच्या कलम ३२४ अन्वये संसद आणि राज्य विधीमंडळाच्या निवडणुका मुक्त, पारदर्शक आणि शांततापूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी राजकीय पक्ष आणि उमेदवार वैधानिक कर्तव्ये योग्य रितीने पार पाडतात का? यावर निवडणूक आयोग देखरेख करतो तर राजकीय पक्षांनी आणि त्यांच्या उमेदवारांनी निवडणुकीच्या काळात काय करावे आणि काय करू नये, याची नियमावली म्हणजेच आचारसंहिता होय.



### आदर्श आचारसंहिता अस्तित्वात कशी आली?

१९६० मध्ये केरळ राज्यात विधानसभेच्या निवडणुकावेळी निवडणूक आयोगाने पक्ष आणि उमेदवारांना वर्तणुकीसंदर्भात काही सूचना दिल्या. १९६२मध्ये लोकसभा निवडणुकीच्या वेळी नोंदणीकृत पक्षांना ही मार्गदर्शक तत्त्वं पुरवण्यात आली आणि राजकीय पक्षांनी ही मार्गदर्शक तत्त्वं स्वीकारावी, अशी विनंती करण्यात आली. राजकीय पक्षांनी ही तत्त्वं स्वीकारली. या निवडणुकीत या मार्गदर्शक तत्त्वांचं बहुतांशरीत्या पालन झालं, असं दिसल्यानंतर पुढच्या निवडणुकीत म्हणजेच १९६७ला पुन्हा मार्गदर्शक तत्त्वं जारी करण्यात आली.

सत्ताधारी पक्षांकडून निवडणुकीत होणारा सत्तेचा गैरवापर टाळण्यासाठी निवडणूक आयोगाने १९७९ मध्ये विविध राजकीय पक्षांशी सल्लामसलत करून पुन्हा काही उपाय योजले. १९७९ मध्ये मार्गदर्शक तत्त्वांमध्ये महत्त्वाचं प्रकरण समाविष्ट करण्यात आलं. सत्तेत असलेल्या पक्षाला निवडणुकीच्या प्रचारात फायदा होऊ नये, यासंदर्भात नियमावली तयार करण्यात आली. १९९१ मध्ये तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त टी. एन. शेषन यांनी एकत्रित आणि सर्वसमावेशक स्वरूपात सर्वप्रथम आचारसंहिता लागू केली. शेषन यांच्या काळात आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीस सुरुवात झाली आणि सर्वत्र हा चर्चेचा विषय ठरला. शेषन यांच्या आचारसंहितेमुळे निवडणूक आयोगालाही एक वेगळी ओळख प्राप्त झाली. पक्षाच्या जाहीरनाम्यासंदर्भात मार्गदर्शक तत्त्वांचा समावेश करावा, असा आदेश सुप्रीम कोर्टाने निवडणूक आयोगाला २०१३मध्ये दिला. त्याची परिणती आपल्याला २०१४च्या लोकसभा निवडणुकीवेळी पाहायला मिळाली.

### आचारसंहितेमध्ये कोणत्या गोष्टींचे पालन होणे आवश्यक आहे?

कुठल्याही पक्षाला प्रतिस्पर्धी पक्षाच्या प्रचार सभांमध्ये, मिरवणुकांमध्ये भाषणांमध्ये कसल्याच प्रकारचा अडथळा आणण्याचा अधिकार नाही. अन्यथा त्या उमेदवाराची उमेदवारी रद्द निवडणूक आयोगाकडून रद्द होऊ शकते. आचारसंहितेच्या काळात कोणत्याही पक्षाला अथवा सरकारला आर्थिक लाभाच्या, मनोरंजनात्मक योजनांची घोषणा करता येत नाही. तसंच योजनांची अमंलबजावणीही बंद ठेवावी लागते. आचारसंहितेच्या काळात कोणत्याही पक्षाला सरकारी वाहने, विमाने आणि हेलिकॉप्टरचा निवडणुकीच्या प्रचारासाठी वापर करता येत नाही. तसंच सरकारी मालमत्ता, सरकारी गेस्ट हाऊस इथं हक्क गाजवता येत नाही. असं केल्यास आचारसंहितेचा भंग ठरतो.

राजकीय पक्षांना एकमेकांच्या राजकीय धोरणावर टीका करण्याची मुभा असते. ते त्यांच्या कामकाजावर टीका करू शकतात, पण मतं मिळवण्यासाठी ते एकमेकांची जात किंवा धर्म काढू शकत नाहीत. मंदिर, मशिदी, चर्च, गुरूद्वारा किंवा इतर कोणत्याही प्रार्थनास्थळांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे, भित्तीपत्रके आणि निवडणूक प्रचाराची जागा म्हणून करू नये. इतर पक्षांनी लावलेली भित्तीपत्रके काढून टाकू नये अथवा विद्रुप करू नये.

मतदारांना आमिष देणं किंवा धमकावणं, हे आदर्श आचारसंहितेचा भंग करणारं ठरू शकतं. बैठका किंवा रॅली घेण्यापूर्वी पोलिसांची परवानगी घेणं आवश्यक असतं. पोलिसांना सभेची वेळ सांगावी लागते, म्हणजे पोलीस योग्य तशी सुरक्षा व्यवस्था करू शकतात. एखाद्या सभेत विरोधकांचा पुतळा जाळणं, हेही नियमात बसत नाही. तसंच जर दोन विरुद्ध पक्षांचा एकाच वेळी रोड शो असेल तर त्यांचे रस्ते एकच असणार नाहीत किंवा रस्त्यातच त्यांची गाठ पडणार नाही, याची काळजी पोलिसांना घ्यावी लागते. जाहीरनाम्यात असं वचन देता येत नाही, ज्यामुळे मतदारांवर खूप मोठा परिणाम होईल. पूर्ण होतील, अशीच वचनं जाहीरनाम्यात असावी, असं मार्गदर्शक तत्त्वं सांगतात

सत्ताधाऱ्यांसाठी ही नियमावली करण्यात आली आहे. त्यामध्ये १९७९ मध्ये हे नियम समाविष्ट करण्यात आले. मंत्र्यांनी आपले कार्यालयीन दौरे आणि राजकीय बैठकी एकत्र घेऊ नयेत. पक्षाच्या कामासाठी सरकारी यंत्रणेचा वापर करणं म्हणजे आचारसंहितेचा भंग ठरतं. सरकारी माध्यमांचा वापर करून पक्षाची जाहिरात करता येत नाही. आचारसंहितेच्या काळात मंत्र्यांना किंवा सरकारला नव्या घोषणा करता येत नाहीत. त्यासाठी निधी जाहीर करता येत नाहीत. इतर पक्षांना देखील सरकारी मैदानं आणि विश्रामगृहाचा वापर करता यावा, अशी तरतूद असते. फक्त सत्ताधारी पक्षानेच त्यावर अधिकार गाजवू नये, अशी त्यामागची भावना असते. आचारसंहितेत हे करता येईल निवडणुका घोषित होण्यापूर्वी निवडणूक क्षेत्रात प्रत्यक्षपणे सुरू करण्यात आलेले कार्यक्रम पुढे चालू ठेवता येतील. पूर, अवर्षण, रोगाची साथ किंवा इतर नैसर्गिक आपत्ती यामुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रांतील जनतेसाठी पुनर्वसन कार्य सुरू ठेवता येईल. गंभीररित्या आजारी असेलेल्या व्यक्तींना वैद्यकीय सुविधा चालू ठेवता येईल.

आदर्श आचारसंहितेचा कालावधी हा निवडणुकीची तारीख जाहीर झाल्यापासून ते निवडणुकीचे निकाल लागे पर्यंत आचारसंहिता पाळण्याचं कायदेशीर बंधन असते. भारतीय दंडविधान आणि क्रिमिनल प्रोसेजर कोड तसंच लोकप्रतिनिधी कायदा १९५१मध्ये ज्या नियमांचा समावेश आहे त्यांचं उल्लंघन झाल्यास कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते, जसं की धार्मिक तेढ वाढवणारी वक्तव्यं करणं.

आदर्श आचारसंहितेसंबंधी गाजलेली काही प्रकरणामध्ये मायावती यांनी लखनौ तसंच नोएडामध्ये काही स्मारकांची उभारणी करून त्यात हत्तीचे पुतळे उभे केले होते. हत्ती हे मायावती यांच्या बहुजन समाज पार्टीचं चिन्ह आहे. या पुतळ्यासंदर्भात निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करण्यात आली होती. आयोगाने सांगितलं की, निवडणुकीची घोषणा होण्याआधी आम्ही त्यावर कारवाई करू शकत नाही. निवडणूक आयोगाला हायकोर्टात आव्हान देण्यात आलं. बहुजन समाज पक्षाचं चिन्हच बदलण्यात यावं, अशी विनंती याचिकाकर्त्याने केली. हायकोर्टानं सांगितलं की त्यांचं चिन्ह बदलता येणार नाही. हायकोर्टानं निवडणूक आयोगाला सूचना केली की पक्षाच्या चिन्हांसंदर्भात तुम्ही नियमावली तयार करावी. जनतेचा पैसा वापरून स्वतःच्या पक्षाचं प्रतीक उभं करू नये, याचं भान पक्षाने ठेवावं, असं निरीक्षण दिल्ली हायकोर्टाने मांडलं. नंतर निवडणुकीच्या काळात म्हणजेच २०१२मध्ये हे हत्ती कापडाने झाकून ठेवण्यात आले होते. नरेंद्र मोदी यांनी २०१४मध्ये मतदान केल्यानंतर मतदान केंद्राबाहेर हातात कमळ घेऊन सेल्फी घेतला होता. त्या आधारावर मोदींविरोधात एफआयआर दाखल करण्यात आली होती. आम आदमी पार्टीच्या एका कार्यकर्त्याने याविरोधात याचिका दाखल केली होती. २०१५मध्ये हायकोर्टाने ही याचिका फेटाळली. मोदी यांनी मतदान केंद्राच्या बाहेर पत्रकार परिषद घेतली होती आणि सेल्फी घेतली होती, असं गुन्हे अन्वेषण शाखेने कोर्टात सांगितल्यावर ही याचिका फेटाळण्यात आली.

राहुल गांधी यांना २०१७ साली गुजरात निवडणुकीच्या वेळी निवडणूक आयोगाने नोटीस बजावली होती. मतदानाच्या पूर्वसंध्येला राहुल गांधी यांनी वृत्तवाहिनीला मुलाखत दिली होती. त्यावरून निवडणूक आयोगाने वृत्तवाहिन्यांना जाब विचारला होता. या वाहिन्यांविरोधात एफआयआर दाखल करावी, अशी सूचना आयोगाने अधिकाऱ्यांना केली होती.

**-नितीन देशमुख, पनवेल**

## बदलते तंत्रज्ञान

# लवकरच 'विवो'चा दोन रंगांत जबरदस्त स्वस्त स्मार्टफोन

काही काळापासून भारतामध्ये विवो व्हाय२००ई ५जी (VIVO Y200e 5G) भारतात लाँच होणार असल्याची नुसती चर्चा सुरू होती. मात्र, आता ग्राहकांची प्रतीक्षा संपली असून, विवो Y200e 5G भारतात या महिन्यात लाँच होणार आहे. अर्थातच यात अनेक उत्तम फीचर्स आहेत. काय आहे या स्मार्टफोन्सच्या किमती आणि खासियत पाहा.



विवो Y200e 5G भारतात २२ फेब्रुवारी रोजी लाँच होणार आहे. कंपनीने एक्स (ट्विटर)वर पोस्ट शेअर करीत ग्राहकांसाठी स्मार्टफोनचे डिझाईन आणि रंग पर्याय सांगितले आहेत. या स्मार्टफोनचे ऑक्टोबर २०२३ मध्ये अनावरण करण्यात आले होते; जो आता फेब्रुवारी महिन्यात लाँच करण्यात येईल.

गॅजेट ३६० यांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतात विवो Y200e 5G ची किंमत २० हजार रुपये इतकी असणार आहे. या मॉडेलमधील स्मार्टफोनसाठी निळा आणि नारंगी अशा दोन रंगाचे पर्याय मिळणार आहेत. या पोस्टमध्ये स्मार्टफोनचा केशरी रंग पर्याय पॅनेलवर व्हेगन लेदर फिनिश आणि स्टिचसारख्या क्रिस-क्रॉस पॅटर्नसह; तर निळा रंग पर्याय टेक्स्चर फिनिशसह दिसतो आहे. पण, त्यात फॉक्स लेदरऐवजी प्लास्टिकचा बॅक ग्राहकांना दिला जाऊ शकतो. हा स्मार्टफोन ६ जीबी व ८ जीबी रॅम पर्यायांसह लाँच होईल. तसेच कंपनीने सांगितले आहे की, रॅम १६ जीबीपर्यंत वाढवला देखील जाऊ शकतो.

Vivo Y200e 5G स्मार्टफोनमध्ये १२०एचझेड रिफ्रेश रेट आणि १२०० नीट्सच्या पीक ब्राइटनेससह ६.६७ इंच फुल-एचडी प्लस + सॅमसंग एमोलेड डिस्प्ले असणार आहे. तसेच स्मार्टफोन Qualcommच्या Snapdragon 4 Gen 2 SoC द्वारे समर्थित आणि ॲण्ड्रॉइड १३ किंवा ॲण्ड्रॉइड १४ -आधारित यूआयसह पाठविण्याची अपेक्षा कंपनीने वर्तवली आहे. ४४ डब्ल्यू वायर्ड फास्ट चार्जिंगसाठी विवोच्या या फोनमध्ये 5,000mAh बॅटरी पॅक असणार आहे.

विवोच्या या स्मार्टफोनमध्ये ५० मेगापिक्सेलचा प्रायमरी आणि पाच मेगापिक्सेलचा सेकंडरी सेन्सर स्मार्टफोनच्या मागील बाजूस असणार आहे. तर फ्रंट कॅमेरा १६ मेगापिक्सेल सेन्सरचा असणार आहे. फोन इन-डिस्प्ले फिंगरप्रिंट स्कॅनर, ड्युअल स्टीरिओ स्पीकर आणि धूळ व स्प्लॅश Resistanceसाठी आयपी५४ रेटिंगसह दिला जाऊ शकतो. या स्मार्टफोनचे वजन सुमारे १८५.५ ग्रॅम आणि त्याची जाडी सुमारे ७.७९ मिमी असणार आहे. या जबरदस्त फीचर्ससह विवोचा हा स्मार्टफोन लवकरच ग्राहकांसाठी लाँच करण्यात येईल.

# ...म्हणून साजरा होतो जागतिक मातृभाषा दिन

आंतरराष्ट्रीय स्तरावर बहुभाषावादाला प्रोत्साहन देण्यासाठी, भाषिक आणि सांस्कृतिक विविधतेला चालना देण्यासाठी दरवर्षी २१ फेब्रुवारीला संयुक्त राष्ट्र संघटनेतर्फे जागतिक मातृभाषा दिवस साजरा करण्यात येतो. जागतिक मातृभाषा दिवस युनेस्कोच्या वतीनं (UNESCO) १९९९ साली पहिल्यांदा साजरा करण्यात आला. त्याला संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने २००२ साली मान्यता दिली.

मराठी, हिंदी आणि भारतीय भाषांबद्दल बोलत असताना जागतिक स्तरावरही अनेक मातृभाषा आहेत. या जगभरातील मातृभाषा जपल्या जाव्यात या निमित्ताने आज जागतिक मातृभाषा दिन साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्राकडून (UN) हा दिवस साजरा करायला सुरूवात झाली. जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानाचा मोठ्या प्रमाणात वाढलेल्या वापराने जगभरातील अनेक मातृभाषा लोप पावत चालल्याचे चित्र आहे. मात्र, असे होऊ नये यासाठी युनेस्कोने पुढाकार घेत मातृभाषा आणि त्याबरोबर संबंधित संस्कृती टिकावी यासाठी आजच्या दिवसाची निवड केली आहे. त्यामुळे जगभरात आजचा दिवस International Mother language day म्हणून साजरा केला जातो.

जगात सुमारे ७ हजार भाषा बोलल्या जातात. भारतातही प्रामुख्याने २२ भाषा



## निमित्त

बोलल्या जातात. भारतात जवळपास १३०० च्या आसपास मातृभाषा आहेत. आंतरराष्ट्रीय मातृभाषा दिनाच्या दिवशी जगभरात अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात. यानिमित्ताने शिक्षण आणि साहित्याशी निगडित लोक विविध भाषांबद्दल चर्चा करतात. मातृभाषेबद्दल जागरूकता निर्माण करणे, भाषिक विविधता जोपासणे, त्याचे महत्त्वदेखील अधोरेखित केले जाते. जगात काही मातृभाषा लोप पावत असल्याबद्दलही जागतिक पातळीवर चिंता व्यक्त केली जाते. मातृभाषेचे संवर्धन करणे, मातृभाषेचा प्रचार-प्रसार करण्याबाबत धोरण ठरवले जाते.

भारताच्या फाळणीनंतर पाकिस्तानची निर्मिती झाली. पाकिस्तानची निर्मिती झाली तेव्हा पूर्व पाकिस्तान आणि पश्चिम पाकिस्तान असे दोन भाग होते. पश्चिम बांगलादेशमध्ये उर्दू आणि पश्चिम बांगलादेशमध्ये बंगाली भाषिकांचे प्रमाण अधिक होते. तत्कालीन पाकिस्तान सरकारने भाषा धोरण लागू करून पाकिस्तानची अधिकृत भाषा म्हणून उर्दूला मान्यता दिली होती. पाकिस्तान सरकारच्या या धोरणाच्या विरोधात ढाका विद्यापीठात विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरू केले. ढाका विद्यापीठातील आंदोलनावर पोलिसांनी २१ फेब्रुवारी १९५२ रोजी गोळीबार केला होता. आंदोलनाच्या परिणामी पाकिस्तान सरकारला नमतं घ्यावं लागले आणि बंगाली भाषेलाही मान्यता दिली.

मातृभाषा ही माणसाच्या संस्कारांची वाहक असते. मातृभाषेशिवाय कोणत्याही देशाच्या संस्कृतीची कल्पना करणे निरर्थक आहे. मातृभाषा आपल्याला राष्ट्रीयतेशी जोडते आणि देशभक्तीची भावना प्रेरित करते. मातृभाषा ही आत्म्याचा आवाज आहे आणि जपमाळाच्या पट्ट्याप्रमाणे देशाला धागा देते. आईच्या कुशीत विकसित होणारी भाषा ही मुलाच्या मानसिक विकासाला शब्द आणि पहिला संवाद प्रदान करते. मातृभाषा सर्वप्रथम अनौपचारिक शिक्षण देते आणि विचार, समज आणि वर्तनाची समज देते. मुलाचे प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच झाले पाहिजे.

**(साभार : इंटरनेट)**


## क्लिक...क्लिक...!



**मुरुड : समुद्रकिनारी सुंदर सूर्यास्त होताना पर्यटकांची वाट पाहत बसलेला गोळावाला टिपला आहे छायाचित्रकार सुधीर नाझरे यांनी.**

## आरोग्य प्रहर

# वारंवार चेहरा धुण्याची सवय योग की अयोग्य?



उन्हाळ्याला सुरुवात होणार आहे. अशा स्थितीत त्वचेची विशेष काळजी घेण्याची गरज आहे. सूर्यप्रकाश, उष्णता आणि घाम यामुळे त्वचेवर अनेक समस्या निर्माण होतात. यामुळेच उन्हाळ्यात लोक वारंवार चेहरा धुतात. जेव्हा तुम्ही उठता तेव्हा प्रथम चेहरा धुवा, यामुळे आळस तर दूर होतोच पण तुमच्या शरीराला लगेच ताजेतवाने वाटते. सकाळी चेहरा धुतल्याने छिद्र साफ होतात. लक्षात ठेवा की तुम्ही तुमचा चेहरा सामान्य पाण्याने सौम्य फेसवॉशने धुवा.

जर तुमच्या त्वचेचा प्रकार तेलकट असेल तर तुम्ही दुपारी सुद्धा एकदा चेहरा धुवू शकता. तेलकट त्वचा असणाऱ्यांनी डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार साबण किंवा फेसवॉशचा वापर करावा.

सकाळी चेहरा धुतल्यानंतर तेलकट त्वचेच्या लोकांच्या चेहऱ्यावर दुपारपर्यंत तेल जमा होऊ लागते. त्यामुळे असे लोक दुपारीही थंड पाण्याने किंवा फेसवॉशने चेहरा स्वच्छ करू शकतात. जेव्हाही तुम्ही कामावरून परतता तेव्हा चेहरा पूर्णपणे स्वच्छ करा. यामुळे दिवसभराचा थकवा दूर होतो. चेहऱ्यावर साचलेली घाणही साफ होते.

काही लोक उन्हाळ्यात संध्याकाळी अंघोळही करतात. जर तुम्ही हे करू शकत नसाल तर एकदा तरी तुमचा चेहरा पूर्णपणे धुवा. आपल्या आहारात फळे आणि भाज्यांचे प्रमाण वाढवा. विशेषत: गाजर, काकडी, पपई, डाळिंब, कोरफड यासारख्या गोष्टींचे सेवन केल्यास चेहरा निरोगी राहील.

जर तुम्हाला तुमची त्वचा निरोगी आणि चमकदार बनवण्यासाठी जास्तीत जास्त पाणी पिण्याची सवय लावा. यामुळे त्वचा हायड्रेटेड आणि मॉइश्चरायझेशन राहील.

**टीप : वरील सर्व बाबी केवळ माहिती म्हणून वाचकांपर्यंत पोहचवत आहे.**

# कर्जतमध्ये गुरांनी भरलेला टेम्पो पकडला

## चार जनावरांची सुटका; एकजण ताब्यात, दुसरा फरार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्याच्या वेशीवर असलेल्या भागातून गोवंशीय जनावरांना घेऊन एक टेम्पो जात होता. या टेम्पोचा संशय पोलिसांना आला. त्यांनी तो थांबवून तपासण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांना चकवा देत पळून जाणाऱ्या टेम्पोला पकडले. त्यामध्ये चार गोवंशीय जनावरे कोंबून भरलेली दिसली. त्यानंतर टेम्पो टाकून पळून जाणाऱ्या एकाला पोलिसांनी पकडले. दुसऱ्याचा शोध पोलीस घेत आहेत.

चिकनपाडा-साळोख रोडने जाणारा मिनी टेम्पो (एमएच ०५ इएल ८६१९) हा संशयास्पद जाताना दिसला. सहाय्यक फौजदार श्रीरंग किसवे यांनी गाडीचा पाठलाग करून गाडी अडवली. चालक आणि क्लिनरला गाडीची पाहणी करायची आहे, असे सांगताच त्या दोघांनी चकवा देत तेथून पळ काढला. किसवे यांनी टेम्पोची पाहणी केली असता त्यामध्ये चार गोवंशीय जनावरे असल्याचे दिसले. त्यांनी ही बाब नेरळ प्रभारी अधिकारी शिवाजी ढवळे यांना सांगितली. विलंब न लावता त्यांनी चिकनपाडा येथे धाव घेत पाहणी केली. त्यातील एका आरोपीला पकडण्यात नेरळ पोलिसांना यश आले आहे, तर दुसऱ्या आरोपीचा शोध सुरू आहे. आरोपींवर गुन्हा नोंद केला आहे.

चारही गोवंशीय जनावरांना नेरळ येथील गोशाळा येथे रात्री सोडण्यात आले असून मिनी टेम्पो ताब्यात घेण्यात आला आहे. अधिक तपास शिवाजी ढवळे यांच्या मार्गदर्शनखाली पोलीस उपनिरीक्षक लोढे करीत आहेत.

# महाड नेवाळी गावातील तरुणाची आत्महत्या

**महाड** : किल्ले रायगड परिसरातील नेवाळी गावातील २१ वर्षीय तरुणाने सोमवारी (दि. १९) रात्री आत्महत्या केली.

नेवाळी गावातील अभय वसंत शिंदे (वय २१) याने सोमवारी रात्री घरात गळफास लावून आत्महत्या केली. याबाबत तत्काळ महाड तालुका पोलिसांनी पंचनामा केला. आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झाले नाही. मृत तरुण हा एका खासगी कंपनीमध्ये कामाला होता, अशी माहिती ग्रामस्थांनी दिली. याबाबत अधिक तपास महाड तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस करीत आहेत.

# महारक्तदान शिबिराला प्रतिसाद

**मुरूड** : नरेंद्राचार्य महाराज संस्थानतर्फे रक्तदान शिबिर उसरोली टेप येथे करण्यात आले होते. शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळून ग्रामीण भागातील १०८ लोकांनी रक्तदान केले.

महाशिबिरासाठी भाजपचे जिल्हा सरचिटणीस ॲड.महेश मोहिते, नांदगाव माजी सरपंच भाई सुर्वे, पंचक्रोशी अध्यक्ष शरद काबुकर, शैलेश काते, माजी सरपंच रमेश दिवेकर, उसरोली सरपंच महेशकुमार पाटील, नांदगाव सरपंच सेजल घुमकर, उपसरपंच मेघा मापगांवकर, विशाल पाटील, श्री संप्रदाय तालुकाध्यक्ष महेश मोठेबूवा, सचिव अंकुश वाडकर, संतोष चोरघे, सुधीर पुलेकर, जितेंद्र पाटील, महिलाध्यक्ष प्राची पाटील, श्रद्धा गायकर, अंजली जगताप, मधुकर जासूद, भक्तगण उपस्थित होते.



# खोपोलीत शिवपुतळ्याला मध्यरात्री अभिवादन

**खोपोली : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज जयंती खोपोलीत उत्साहात साजरी करण्यात आली. शिवजयंतीच्या मध्यरात्री १२ वाजता छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याला आमदार महेंद्र थोरवे व अन्य सर्वपक्षीय नेते आणि शिवप्रेमींच्या उपस्थितीत अभिवादन करण्यात आले. या वेळी महाआरती करण्यात आली. त्याचप्रमाणे दीड कोटी निधी खर्च करून शिवस्मारकाचे सुशोभीकरण व शिवाजी महाराज पुतळ्यासमोर सुवर्ण जिरेटोपचे अनावरण आमदार थोरवे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

याच वेळी आमदार थोरवे यांनी सुशोभीकरणासाठी एक कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी देण्याची घोषणा केली. खोपोली नगरपालिकेकडून शहरात शिवजयंती महोत्सव साजरा करण्यात येतो. तीन दिवस हा महोत्सव साजरा केला जातो. याही वर्षी मोठ्या उत्साहात शिवजयंती महोत्सव साजरा करण्यात आला.

रविवारी संध्याकाळी पोवाडा व शिवकीर्तनाचा कार्यक्रम, रात्री १२ वाजता महाआरती व छत्रपतींना अभिवादन कार्यक्रम, सोमवारी पालिका मुख्य कार्यलयात भव्य शिवअभिवादन कार्यक्रम झाला. संध्याकाळी ६ वाजल्यापासून छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा अशी भव्य शोभायात्रा आयोजित करण्यात आली होती.

यात शहरातील सर्व शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, राजकीय पक्ष, सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# इर्शाळवाडीत शिवजयंती उत्साहात साजरी

**चौक : प्रतिनिधी**

इर्शाळवाडीच्या दुर्घटनेनंतर कंटेनर हाऊस येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करताना अनेकांना आपले अश्रू अनावर झाले. जीतू ठाकूर हे शिक्षक गेली काही वर्षे सहकाऱ्यांसमवेत इर्शाळवाडीवर छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करतात. या वेळी चौक सरपंच रितु ठोंबरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या.

त्या ठिकाणी स्वच्छता अभियान, शिक्षणाचे महत्त्व, दारूबंदी यावर मार्गदर्शन करायचे. सर्वांसोबत भोजन करून पुन्हा इरसाल वाडी उतरायचे. १९ जुलै २०२३ रोजी इर्शाळवाडीच्या दुर्घटनेनंतर प्रथमच कंटेनर हाऊस येथे शिक्षक संघटनेचे अध्यक्ष जितू ठाकूर यांनी शिवजयंती साजरी केली. डोंगरावर माझी शाळा आणि इरसाल गाव माती आड गेलं या दोन कविता महेंद्र जाधव यांनी सादर केली. माणसे कशी जोडली जातात, अंधश्रद्धा आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्यावर आरती नाईक यांनी केले. दुर्घटनाग्रस्त कमळू यांनी शिक्षक जितू ठाकूर यांच्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना सरपंच रितु ठोंबरे म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांचा वारसा जपण्याचा अभिनव उपक्रम शिक्षक राबवत असल्याचा आनंद होत आहे, आपण सर्व प्रकारचे सहकार्य करू, असे आश्वासन दिले. कार्यक्रमानंतर भेटवस्तू आणि खाऊचे वाटप करण्यात आले.




सिडको
शहरांचे शिल्पकार

# जाहीर सूचना

**(वाटपपत्र/करारनामा करणेबाबत)**

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून, खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | गाव व संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे क्र. | संपादित क्षेत्र | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्य:स्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती व शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | **ता.पनवेल, जि.रायगड** | |
| १. | तळोजा ४७३+ ८५२ | तळोजा ८७ D/७५ | १८०/१ब पै | ०-१५-४ | १५० चौ.मी. | **भुखंड क्र. ३५, सेक्टर- १६, क्षेत्र-१५० चौ.मी.** | कै. चंदर कृष्णा गायकवाड उर्फ गायकर यांचे दि. ११.१०.२००७ रोजीचे मृत्युपत्रनुसार प्रोबेट सर्टिफिकेट CMA No.४२/२०१३, दि. चौ.अर्ज ४२/२०१३ अन्वये घोषित केलेले वारस :<br>१.१) श्री.भगवान चंदर गायकवाड उर्फ गायकर<br>१.२) श्री.अभिमन्यू चंदर गायकवाड उर्फ गायकर<br>वरील नमूद मा. न्यायालयीन प्रोबेट नुसार वाटपाची पूढील कार्यवाही करण्याकरिता प्रस्तावित आहे. | **कै.शंकर कृष्णा गायकवाड उर्फ गायकर (मयत)** वारस दाखला व दिवाणी चौकशी अर्ज क्र.-७६७/२००८ व दिवाणी चौ.अर्ज क्रं. ५०७/२०१६ अन्वये कै.शंकर कृष्णा गायकवाड उर्फ गायकर (मयत) यांचे वारस अन्वये वारस- १. श्रीमती कृष्णाबाई महादेव घरत २. श्रीमती पिठीबाई उर्फ निर्मला वामन पाटील<br>**कै. बळीराम कृष्णा गायकवाड उर्फ गायकर (मयत)** (मृत्यू दि.- ११/८/२०१३) वारस दाखला व दिवाणी चौकशी अर्ज क्र.-८९७/२०१५<br>१. श्रीमती गुणाबाई बळीराम गायकवाड २. श्री.भरत बळीराम गायकवाड ३. श्री.लक्ष्मण बळीराम गायकवाड ४. श्रीमती .पुष्पा हरिश्चंद्र पाटील ५. श्रीमती. संगिता अभिमन्यू पाटील<br>**चंदर कृष्णा गायकवाड उर्फ गायकर (मयत)** (मृत्यू दि.- २३/०२/२०१२) **बायमाबाई चंदर गायकवाड उर्फ गायकर (मयत** दि.-११/०७/१९७०) **मंदा चंदर गायकर (मयत** दि.- १०/०५/२०१५) यांचा वारस दाखला व दिवाणी चौकशी अर्ज क्र.-९२५/२०१५ यांचे वारस - १. श्रीमती निराबाई उर्फ अनुबाई शालिक पाटील २.श्रीमती शकुंतला राजाराम पाटील ३. श्री.भगवान चंदर गायकवाड उर्फ गायकर ४.श्रीमती गुलाबबाई आत्माराम उलवेकर ५.श्रीमती चंद्राबाई प्रकाश जांभळे ६.श्री.अभिमन्यू चंदर गायकवाड उर्फ गायकर<br>**कै. मंजुळाबाई नामदेव मयेकर (मयत)** (मृत्यू दि.- १३/०१/२००१ ) नुसार वारस दाखला व दिवाणी चौकशी अर्ज क्र.-५०९/२०१६ श्री.भानुदास नामदेव मयेकर उर्फ मोहोकर १. श्री.विजय नामदेव मयेकर उर्फ मोहोकर २.श्रीमती रंजना प्रदिप पाटील उर्फ रंजना नामदेव मयेकर उर्फ मोहेकर<br>सह. दुय्यम निबंधक- पनवेल-१, दस्त क्र. १५२०/२०११, हे हक्कसोडपत्र सादर केलेले आहे.:- १. श्री. चंदर कृष्णा गायकर उर्फ गायकवाड **(हे लिहून घेणार एकपक्षी)**<br>तसेच १. श्रीमती. कृष्णाबाई महादेव घरत, २. श्रीमती.पिठाबाई उर्फ निर्मला वामन पाटील, ३. श्री. बळीराम कृष्णा गायकर, ४. श्री. भानुदास नामदेव मोहोकर उर्फ मयेकर, ५. श्री. विजय नामदेव मोहोकर उर्फ मयेकर, ६. सौ. रंजना प्रदीप पाटील **(हे सर्व लिहून देणार दुसरेपक्षी)**<br>वरील नमूद वारस दाखल्यान्वये तसेच हक्कसोडपत्रकान्वये कोणाची हरकत असल्यास, सदरची हरकत लेखी स्वरूपात मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (१२.५ टक्के) भूमी या कार्यालयात लेखी स्वरूपात नोंदवावी. |
| २. | उलवे २९२ | गव्हाण २७७ | २२५/३<br>२२६/१ | ०-१२-०<br>०-३३-९ | ८५० चौ.मी. प्रस्तावित | **उलवे नोड येथील भूखंड क्र.१५, सेक्टर-१७, क्षेत्र-८३८.४९ चौ.मी.** | **श्री. काशिनाथ त्रिंबक भगत** | **स्पे.मु.क्र.१४६/२०१४** |
| | | गव्हाण २७७ | २५२/२<br>२५२/९ | ०-१४-०<br>०-०८-० | | | | |
| | | गव्हाण ४८८ | २३०/१(१) | ०-१७-६ | | | | |
| | | गव्हाण ७४३ | २३१/२ | ०-१४-१ | | | | |
| | | | **एकुण** | **०-९९-६** | | | | |
| ३. | उलवे ७६३ | वहाळ ३८१ब | ११०/५<br>७२/१<br>४३/३<br>५५/१२ | ०-०१-०<br>०-१६-६<br>०-२४-६<br>०-०३-५ | ४०० चौ.मी. पैकी ३०० चौ.मी. प्रस्तावित | **उलवे नोड येथील भूखंड क्र.१९०H, सेक्टर-२३, क्षेत्र-२९७.११ चौ.मी.** | हक्कसोडपत्रान्वये लाभार्थी भुधारक<br>१) श्री. शांताराम बापू पाटील, २) श्री. रविंद्र गजानन पाटील, ३) श्री. प्रदिप नामदेव पाटील, ४) श्री. प्रणय नामदेव पाटील, ५) श्री. विश्वनाथ महादेव पाटील, ६) श्रीमती अनिता महादेव पाटील, ७) श्रीमती संगीता अशोक म्हात्रे, ८) श्रीमती ललीता महादेव पाटील, ९) श्रीमती रजनी कांचन पाटील व १०) श्री. दिलीप तुकाराम पाटील | दुय्यम निबंधक पनवेल-१ येथे दि. २२.०२.२०११ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल५-१७२९-२०२३ अन्वये दिनांक ०१.०२.२०२३ रोजी केलेले नोंदणीकृत हक्कसोड पत्र |
| | | वहाळ १८३ | ४६९/३<br>४६१/६ | ०-१८-६<br>०-०५-० | २०० चौ.मी. प्रस्तावित | **उलवे नोड येथील भूखंड क्र.६४, सेक्टर-१०B, २०० चौ.मी.** | हक्कसोडपत्रान्वये लाभार्थी भुधारक १) श्री. हनुमान गणा पाटील, दि. २) श्री. मदन गणा पाटील, ३) श्री. शांताराम बापू पाटील, ४) श्री. रविंद्र गजानन पाटील, ५) श्री. प्रदिप नामदेव पाटील, ६) श्री. प्रणय नामदेव पाटील, ७) श्री. विश्वनाथ महादेव पाटील, ८) श्री. रामचंद्र गंगाराम पाटील, ९) श्री. राजाराम बाळू पाटील, १०) श्री. दिलीप तुकाराम पाटील, ११) श्री. कमलाकर हासूराम पाटील, १२) श्री. निर्दोष हासूराम पाटील, १३) श्रीमती ललिता तैमुर पाटील, १४) श्रीमती आरती हासूराम पाटील, १५) श्री. सुनिल शंकर पाटील, १६) श्री. संदीप सहदेव पाटील, १७) श्री. संदेश सहदेव पाटील, १८) श्रीमती गुणा भानुदास ठाकूर | दुय्यम निबंधक पनवेल-३ येथे दि. ०५.०४.२०२३ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल३- ६२०९-२०२३ अन्वये केलेले नोंदणीकृत हक्कसोड पत्र |
| ४. | उलवे ११६६ | उलवे ६अ | ४/३<br>७/८<br>११३/६ | ०-१०-०<br>०-०९-०<br>०-०१-० | १५० चौ.मी. पैकी उर्वरित ५० चौ.मी. | **उलवे नोड येथील भूखंड क्र.४२१, सेक्टर-१९, क्षेत्र-१४९.५ चौ.मी.,** | **हक्कसोडपत्रान्वये लाभार्थी भुधारक श्री. कृष्णा विठ्ठल म्हात्रे** | मुळ भुधारक कै. अंबु विठ्ठल म्हात्रे (मयत) यांचे कायदेशीर वारस १) श्री. गुरूनाथ अंबू म्हात्रे, २) श्रीमती द्रोपदी मोतीराम मढवी, ३) श्रीमती रंजना जनार्दन पाटील व ४) श्रीमती अंजू उर्फ अंजना राम पाटील ब) कै. महादीबाई बाळाराम घरत यांचे कायदेशीर वारस १) श्री. महेंद्र उर्फ महेंद्रकुमार बाळाराम घरत, २) श्रीमती जनाबाई बाळाराम घरत उर्फ श्रीमती जनाबाई महादेव म्हात्रे, ३) श्रीमती मथुरा अंकुश पाटील व ४) श्रीमती सुवर्णा सुरेश पाटील, क) कै. यशवंत बाळाराम घरत यांचे कायदेशीर वारस १) श्रीमती शोभा यशवंत घरत, २) श्रीमती प्रतिभा संतोष वर्तक, ३) श्री. विजय यशवंत घरत व ४) श्री. राजेश यशवंत घरत, ड) कै. नागुबाई हासू घरत यांचे कायदेशीर वारस १) श्रीमती जयश्री नरेश म्हात्रे यांनी सह दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयाकडे हक्कसोड पत्र क्र. पवल५-१६६७२-२०२२ अन्वये दिनांक १४.१०.२०२२ रोजी हक्कसोडपत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित भूखंडाचे लाभ श्री. कृष्णा विठ्ठल म्हात्रे यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहेत. |
| | | तरघर १६२ब | १०/५ | ०-०९-६ | १०० चौ.मी. | | | |
| | | सोनखार ११२ | १७/१२ | ०-०२-४ | ४० चौ.मी. | **उलवे नोड येथील भूखंड क्र.१०२, सेक्टर-२, क्षेत्र-३९.९८ चौ.मी.** | | |
| | | उलवे ६ब | ८९/६ | ०-१२-० | १०० चौ.मी. | **उलवे नोड येथील भूखंड क्र.५६, सेक्टर-३, क्षेत्र-९९.९६ चौ.मी.** | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकूरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रांसह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पुरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**सिडको भवन, १२.५ टक्के भूमी विभाग, तळ मजला,**
**सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/५९८/२०२३-२४

# नवी मुंबईत ३६ लाखांचे अमली पदार्थ जप्त

## अटक आरोपींमध्ये सर्वाधिक महिला



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोपरखैरणे पोलिसांनी सलग दोन दिवस केलेल्या कारवाईत तब्बल ३६ लाख २० हजारांचे विविध अमली पदार्थ जप्त केले आहेत. धक्कादायक बाब म्हणजे दोन्ही घटनांत महिलांचा सहभाग आढळून आला आहे. आतापर्यंत चार आरोपींना अटक करण्यात आली असून त्यापैकी तीन महिला आहेत तर एक आरोपी फरार असून तीसुद्धा महिलाच आहे.

कोपरखैरणे पोलिसांनी अमली पदार्थ विक्री करणारी टोळी उद्ध्वस्त केली असून तीन जणांना अटक केली आहे. त्यांच्याकडून ३२ लाखांचा ऐवज जप्त करण्यात आला आहे. अमली पदार्थ साठवणे आणि विकणे सुरू असल्याच्या माहितीवरून कोपरखैरणे पोलीस ठाणे हद्दीतील नॅशनल अपार्टमेंट, चौथ्या मजल्यावर, सदनिका कमांक ४०४ मध्ये १६ तारखेला पोलीस पथकाने छापा घातला. त्यावेळी मोहम्मद शमिम ईस्माईल अन्सारी उर्फ सॅम, (वय २७) खालीदा खातून मोहम्मद अजीम अन्सारी (वय २३) आणि आफिया खातुन हयात मोहम्मद अन्सारी (वय १९) हे पोलिसांच्या हाती लागले. त्यांची अंगझडती व घराची झडती घेतली असता अमली पदार्थ मिळून आले. त्यामुळे गुन्हा दाखल करून सर्वांना अटक करण्यात आली. त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

या प्रकरणात आरोपींकडून ६ लाख ३० हजार रुपये किमतीची ६३ ग्रॅम वजनाची एम.डी. पावडर, २५ लाख ३० हजार रुपयांची २५३ ग्रॅम वजनाची ब्राऊन शुगर पावडर व रोख रक्कम १२ हजार ९८० असा एकूण ३१ लाख ७२ हजार ९८० किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

कारवाईच्या दुसऱ्या दिवशी कोपरखैरणे सेक्टर १९ येथे रात्री साडेबाराच्या सुमारास फिरत असलेली संशयित व्यक्ती संतोष राठोड आणि त्याची पत्नी यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. त्यांची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे ४५ ग्रॅमची ब्राऊन शुगर आढळून आली. ज्याची किंमत चार लाख ५० हजार होती, मात्र अंधाराचा फायदा घेत राठोडची पत्नी पळून जाण्यात यशस्वी ठरली. तिच्याकडेही अमली पदार्थ होते. गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुहास चव्हाण तपास करीत आहेत, अशी माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी दिली.

## खारघरमध्येही गुन्हे शाखा पोलिसांची कारवाई

### नायझेरियन व्यक्तीला अटक

**पनवेल : वार्ताहर**

गुन्हे शाखा पोलिसांनी खारघर येथून पाच लाख २० हजार रुपये किमतीचा मेफेड्रॉन हा अमली पदार्थ जप्त केला आहे. याप्रकरणी एका नायझेरियन व्यक्तीला अटक करण्यात आली आहे. खारघर सेक्टर ३५ येथे एक जण अमली पदार्थ विक्रीसाठी येणार असल्याची माहिती अमली पदार्थ विरोधी पथकाला मिळाली होती.

त्याद्वारे वरिष्ठ निरीक्षक नीरज चौधरी यांच्या पथकाने त्याठिकाणी सापळा रचला होता. या वेळी तिथे आलेल्या एका नायझेरियन व्यक्तीला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने त्याचे नाव अब्दुल राक हसन (वय ३४) असल्याचे सांगितले. त्याच्या अंगझडतीमध्ये त्याच्याकडे पाच लाख २० हजार रुपये किमतीचे ५५ ग्रॅम मेफेड्रॉन (एमडी) हा अमली पदार्थ आढळून आला. ग्राहकांना पुरवण्यासाठी हे अमली पदार्थ घेऊन तो त्याठिकाणी आला होता. याप्रकरणी त्याच्यावर खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नवी मुंबईतील काही विभागांप्रमाणे खारघरमध्येही मोठ्या प्रमाणात पोलिसांकडून सातत्याने कारवाई करण्यात येत आहे. मुख्यत्वे झोपडपट्टी परिसरात हे अवैध धंदे अधिक होत असल्याचे कारवाईतून समोर आले आहे. याची पायेमुळे नष्ट करण्यासाठी नवी मुंबई पोलिसांनी कंबर कसली असून सातत्याने यासंदर्भातील कारवाई करण्यात येत आहेत.

## नवी मुंबई पालिकेचा ४९४७ कोटींचा अर्थसंकल्प जाहीर

### १३७७ कोटींची आरंभीची शिल्लक

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेचा सन २०२४–२५चा चार हजार ९४७ कोटींचा अर्थसंकल्प महापालिका आयुक्त तथा प्रशासक राजेश नार्वेकर यांनी मंजूर केला. मुख्य लेखा व वित्त अधिकारी सत्यवान उबाळे यांनी अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले व विजयकुमार म्हसाळ तसेच इतर विभागप्रमुख यांच्या उपस्थितीत अंदाजपत्रकाची प्रत महापालिका आयुक्तांकडे सादर केली.

महाराष्ट्र महापालिका अधिनियमानुसार जमा व खर्चाचे अंदाज आरंभीची शिल्लक रु. १,५४७.६० कोटी व जमा रू. ३२३८.५८ कोटी अशी मिळून एकत्रित जमा ४७८६.१८ कोटी रुपये आणि तीन हजार ४०८.५० कोटी रुपये खर्चाचे सन २०२३–२४ चे सुधारित अंदाज, तसेच १३७७.६८ कोटी रुपये आरंभीच्या शिल्लकेसह जमा चार हजार ९५० कोटी रुपये व चार हजार ९४७.३० कोटी रुपये खर्चाचे आणि २.७० कोटी रुपये शिलकेचे नवी मुंबई पालिकेचे सन २०२४–२५ चे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज मंजूर करण्यात आले. त्याचप्रमाणे नवी मुंबई महापालिका परिवहन उपक्रमाचे अंदाजपत्रक परिवहन व्यवस्थापक योगेश कडुसकर व उपक्रमाचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी तुषार दौंडकर यांनी आयुक्तांकडे सादर केले व मंजूर करण्यात आले.

यंदाच्या अर्थसंकल्पात शिक्षण विभागासाठी १८० कोटी १० लाख म्हणजे एकूण अर्थसंकल्पाच्या ३.६४ टक्के इतकी तरतूद केली आली आहे. मागील अर्थसंकल्पापेक्षा तर आरोग्यासाठी यंदा २१६. ८४ कोटी रूपये तरतुद करण्यात आली आहे. ती एकूण अर्थसंकल्पाच्या ४.३८ टक्के आहे. यंदा काही अंशी शिक्षण व आरोग्याच्या खर्चात मागील अर्थसंकलपाच्या तुलनेत कपात करण्यात आली आहे. महापालिकेस विविध करांच्या रुपाने उपलब्ध होणाऱ्या निधीमधून नागरी सेवा सुविधांची पूर्तता होत असते. त्यामुळे उत्पन्नाच्या बाबींकडे प्राधान्याने लक्ष दिले जात आहे. महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वस्तू व सेवा करापोटी शासनाकडून मिळणारे सहाय्यक अनुदान व मुद्रांक शुल्क, इतर शासन अनुदाने नवी मुंबई महापालिकेचा मालमत्ता कर, नगररचना विभागामार्फत प्राप्त होणारे शुल्क, पाणीपट्टी, मालमत्ता उपयोगिता, विविध सेवा व इतर साधनांपासून मिळणाऱ्या उत्पन्नांचा समावेश आहे.

महापालिका अर्थसंकल्पातील महत्त्वाचे मुद्दे :– आरोग्य, शिक्षणास प्राधान्यक्रम देतानाच स्वच्छता, पर्यावरण, वाहतुक सुविधा, लोककल्याणकारी योजनांवर भर. कोणतीही करवाढ न करता नागरिकांच्या हिताला प्राधान्य. नागरी सुविधा पूर्ततेसाठी आवश्यक खर्चाकरिता उत्पन्नवाढीच्या विविध उपाययोजनांवर भर. सुरू असलेले प्रकल्प कामाचा दर्जा राखून जलद पूर्ण करण्याचे नियोजन. शहर विकासाला गती देत जनसुविधांना प्राधान्य देणारा लोककल्याणकारी अर्थसंकल्प.

**२०२४–२५मध्ये जमा होणारा रुपया**

वस्तू व सेवा कर– १६२६.८५ कोटी, आरंभीची शिल्लक –१,३७७.६८ कोटी, मालमत्ता कर – ९०० कोटी, नगररचना शुल्क– ३०० कोटी, शासन अनुदान –२४४.४३ कोटी, संकीर्ण जमा –१२५.५९ कोटी, पाणी पट्टी व मोरबे– १०४.०४ कोटी, गुंतवणुकीवरील व्याज –१०० कोटी, मुद्रांक शुल्कापोटी शासन अनुदान –९० कोटी, स्थानिक संस्था कर/ उपकर ५० कोटी, परवाना व जाहिरात शुल्क – १५.०८ कोटी, मलनिःसारण –१६.३१ कोटी, एकूण– चार हजार ९५० कोटी रुपये.

**२०२४–२५मध्ये खर्चाचा रुपया**

नागरी सुविधा. ९५४.५७ कोटी, प्रशासकीय सेवा ८६५.३१ कोटी, पाणीपुरवठा व मलनिःस्सारण ५२१.९४ कोटी, इतर नागरी सुविधा (उद्यान, मालमत्ता इ.) ५४८.१० कोटी, माहिती तंत्रज्ञान ७६.५७ कोटी, सामाजिक विकास ५४.६२ कोटी, घनकचरा व्यवस्थापन, क्षेपणभुमी ४३२.१० कोटी, शासन व मनपा निधी अंतर्गत खर्च २५३.९४ कोटी, शासन निधी अंतर्गत खर्च. २०५.३३ कोटी, आरोग्य सेवा २१६.८४ कोटी, ११) परिवहन २५० कोटी, आपत्ती निवारण, अग्निशमन ६८.०५ कोटी, शासकीय कर परतावा. ३०८.२५ कोटी, शिक्षण १८०.११ कोटी, अतिक्रमण ११.५५ कोटी एकूण ४,९४७. ३० कोटी रुपये.

## सानपाडा येथे अखंड हरिनाम सप्ताह

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई सानपाडा येथे देहू येथील गाथा मंदिराचे अध्यक्ष ह. भ. प. पांडुरंग महाराज घुले व श्रीकृष्ण कृपांकित डॉ. विकासानंद महाराज मिसाळ (भागवंताचार्य) यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाने तसेच सानपाडा येथील जनता जनार्दनाच्या सहकार्याने नवी मुंबई सानपाडा येथील अखंड हरिनाम सप्ताह मंडळाच्या वतीने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह सोहळा झाला.

अखंड हरिनाम सप्ताह दरम्यान सर्वश्री ह. भ.प. शंकर महाराज मोरे, ज्ञानेश्वर महाराज कदम, मयूर महाराज बोडके, पांडुरंग महाराज घुले, भाऊसाहेब महाराज पाटील, पुंडलिक महाराज मोरे, ज्ञानराज महाराज म्हात्रे यांची समाज प्रबोधनपर किर्तनसेवा झाली. तर श्रीकृष्णकृपांकीत डॉ. विकासानंद महाराज मिसाळ यांचे काल्याचे मनाला भावनारे किर्तन झाले. त्यानंतर दुपारी १ ते ३ च्या दरम्यान जेवणाचा (भंडारा) कार्यक्रम झाला. सानपाडा येथे मंडळाच्या वतीने दिंडी सोहळा आयोजित केला होता.

किराणा व्यवस्था सर्वश्री मिलिंद सूर्याराव, (समाजसेवक), बन्सी थोरात, नवनाथ भोर यांनी केली. सूत्रसंचालन समाजसेवक भाऊ भापकर यांनी केले. नगरसेवक सोमनाथ वासकर, समाजसेवक अजय पवार, नारायण भोर (अध्यक्ष), सुनील गव्हाणे, बाबाजी इंदोरे, दत्तात्रय वाघ, नंदकुमार मटाले इत्यादी मान्यवरांच्या सहकार्याने व देणगीदारामुळे अखंड हरिनाम सप्ताह सोहळा यशस्वी झाला.

## निवडक

### दुर्ग मावळा प्रतिष्ठानतर्फे शिवजयंती



**उरण :** दुर्गमावळा प्रतिष्ठानच्या वतीने द्रोणागिरी किल्ल्यावर शिवजन्मोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. रविवारी गडाची सफाई आणि सजावट, विमला तलाव येथे दुपारी रक्तदान शिबिर झाले. गडावरील कुंडातील पाण्याने महाराजांच्या मूर्तीचे अभ्यंगस्नान, मशाल फेरी, दिपोत्सव, सोमवारी सकाळी बाळ शिवाजी राजांचा पाळणा, विमला तलाव शिवप्रतिमा पूजन, मिरवणूक, शिवराज्याभिषेक, दुर्ग पूजन, व्याख्यान झाले. सर्व कार्यक्रमांसाठी दुर्ग मावळा प्रतिष्ठान, आगरी कोळी कराडी संघर्ष सामाजिक संस्था, युवा शिवशक्ती मित्र मंडळ, योगा विथ पूनम ग्रुप, सीआयएसएफ स्टाफ, डाऊरनगर ग्रामस्थ आणि शिवप्रेमींनी मेहनत घेतली.

### कोकण भवनात शिवजयंती साजरी




**नवी मुंबई :** महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती कोकण भवनात साजरी करण्यात आली. या वेळी महसूल आणि इतर विभागाचे अधिकरी तसेच कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण देशात मुघलांनी राज्य व्यापले असताना शिवरायांचा जन्म झाला आणि त्यांनी मराठा साम्राज्याचा विस्तार केला. महात्मा जोतिबा फुले यांनी १८६९ साली महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची रायगड येथील समाधी शोधून काढत महाराजांच्या जीवनावर सर्व प्रथम प्रदीर्घ पोवाडा लिहिला. सर्वांत आधी महात्मा जोतिबा फुले यांनी शिवाजी महाराज यांची जयंती सुरु करण्यास सुरुवात केली. त्यानंतर १८९५मध्ये लोकमान्य टिळकांनी शिवजयंतीला उत्सवाचे स्वरुप दिले.

### वक्तृत्व स्पर्धेत विवेक वारभुवन प्रथम

**नवी मुंबई :** माटुंगा येथील रामनारायण रुईया स्वायत्त



महाविद्यालयात शुक्रवारी प्रा. नगोवर्धन पारीख राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले होते. स्पर्धेचे यंदाचे ४५ वे वर्ष होते. नवी मुंबईत वास्तव्य करणारा आणि चेंबूर येथील विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालयात शिक्षण घेणारा विवेक वारभुवन या विद्यार्थ्याने दलित पँथरची ५० वर्षे हा नियोजित विषय आणि 'बळी 'राजा हा उत्स्फूर्त विषय या दोन्ही विषयांवर आपले विचार मांडले.या स्पर्धेत प्रथम क्रमांक व प्रा. गोवर्धन पारीख स्मृती चषक विजेतेपदाचा बहुमान पटकाविला. विवेकच्या या यशाबद्दल नवी मुंबईसह चेंबूर येथील विवेकानंद वरिष्ठ महाविद्यालय आदी सर्व स्तरांतून त्याचे कौतुक होत आहे.

### संतोष ठाकूर यांना पुरस्कार

**उरण :** रायगड प्रेस क्लबच्या १९व्या वर्धापन दिनानिमित्त पत्रकारितेसह सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार समारंभ रविवारी (दि. १८) श्रीवर्धन येथील समुद्रकिनाऱ्यावर झाला. या वेळी ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष, रायगडभूषण सामाजिक संतोष नागा ठाकूर यांना दैनिक लोकमतचे संपादक अतुल कुलकर्णी, कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त तथा रायगड प्रेस क्लबचे संस्थापक एस.एम. देशमुख, राजकीय विश्लेषक तथा ज्येष्ठ संपादक महेश म्हात्रे, रायगड प्रेस क्लबचे जिल्हाध्यक्ष मनोज खांबे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. या कार्यक्रमास खासदार सुनील तटकरे, पत्रकार हल्लाविरोधी संघटनेचे विजय मोकल, मिलिंद अश्टिवकर, शरद पाबळे यांच्यासह जिल्हा पत्रकार संघाचे पदाधिकारी उपस्थित होते.




## कामोठे येथे रक्तदान शिबिर

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

जगद्गुरु नरेंद्रचार्यजी महाराज यांच्या पेरणेने दरवर्षी रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. या वेळी संपूर्ण महाराष्ट्र आणि पाच इतर राज्यात ८५४ महारक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले असून याचाच एक भाग म्हणून कामोठे येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. २०१ बॅग रक्त शिबिरामध्ये संकलित करण्यात आले.

या वेळी मोठ्या संख्येने नागरिकांनी शिबिरामध्ये रक्तदान करून आपले सामाजिक कर्तव्य बजावले. या रक्तदान शिबिराच्या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, रवी जय पावणेकर, प्रमोद भगत उपस्थित होते. या वेळी स्व स्वरुप संप्रदाय तालुका महिला अध्यक्ष धनश्री भोईर, जिल्हा जिल्हा कमिटी तालुका कमिटी, सेवा केंद्र कमिटी व इतर सेवेकरी उपस्थित होते.



## नवीन पनवेलमध्ये शिवजयंती उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल पूर्व सेक्टर ६ मधील जी. सी. अस्पिरा २०६ वसाहतीत मोठ्या उत्साहात छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी झाली. या वेळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मूर्तीची स्थापना, स्वरगंध निर्मित पोवाडे व भक्ती गीतांचा कार्यक्रम, सोसायटी कार्यालय व वाचनालयाचे उद्घाटन, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्रावर व्याख्यान, व्याख्याते राजेंद्र घाडगे, सातारा व वेशभूषा स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.



या वेळी अस्पिरा सोसायटीचे अध्यक्ष, बळीराम साबळे, सचिव, विशाल टोपकर, कोषाध्यक्ष, डी.के. सिंग व सांस्कृतिक कमिटीचे आयोजक प्रशांत खांदवे व साई सितारा को. ऑप. सोसायटीचे अध्यक्ष्य, अजितकुमार कुलकर्णी, सचिव, अरविंद मोरे, त्यांच्या सुविद्य पत्नी प्रा. डॉ. नीलिमा अरविंद मोरे व महापौर डॉ. कविता चौतमोल आदी उपस्थित होते.

वेशभूषा स्पर्धेत मोठ्या संख्येने व उत्साहाने लहान मुलांनी सहभाग घेतला. या वेळी सर्व मुलांचे कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रशांत खांदवे तर आभार सुरेश खरात यांनी मानले.

## पं.सदाशिव पवार संगीत संमेलनाला प्रतिसाद; उमेश चौधरींचे सादरीकरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पं. सदाशिव पवार स्मृतीनिमित्त पश्चिम महाराष्ट्रामधील सातारा येथील स्वरगुंफण संगीत विद्यालय कोडोली येथे स्वर निषाद फाउंडेशन प्रस्तुत संगीत संमेलन आयोजित करण्यात आले होते. १७ व १८ फेब्रुवारी असे दोन दिवस झालेल्या या संमेलनात पनवेल तालुक्यातील खारघर येथील सुपूत्र उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांनी संमेलनात सुरेल स्वर गुंफत रसिकांना मोहित केले.

स्वर गुंफण संगीत विद्यालयाचे विश्वस्त राजन पाटील तसेच सदाशिव पवार यांचे ज्येष्ठ सुपुत्र निषाद पवार, पं. जितेंद्र भोसले आणि प्रज्ञा लाटकर यांच्या हस्ते संमेलनाची सुरुवात करण्यात आली. पहिल्या दिवशी प्रज्ञा लाटकर यांनी राग पुरिया धनश्री या रागाने आपल्या गायनाची सुरुवात केली त्यानंतर राग प्रताप वराली तसेच 'बोलू ऐसे बोल' या अभंगाने रसिकांना भुरळ घातली. त्यांना तबल्यावर निषाद पवार तसेच संवादिनीवर संगीता लोहार यांनी साथसंगत केली.

यानंतर पंडित जितेंद्र भोसले व त्यांचे सुपुत्र कृष्णा भोसले यांनी ताल तीन तालामध्ये स्वतंत्र तबलावादन केले. त्यांना लेहरा साथ दिपाली प्रसाद लोहार यांनी केली आणि पहिल्या दिवसाच्या शेवट पं. मंगेश लटके यांच्या शास्त्रीय गायनाने झाला. त्यांनी राग मारू बिहाग यामध्ये बडा ख्याल व छोटा ख्याल यांचे सादरीकरण केले. त्यानंतर उपशास्त्रीयमध्ये शतजन्म शोधताना, मी वनवासी या भावगीतांचे सादरीकरण केले. कार्यक्रमाच्या शेवटी कैवल्याच्या चांदण्याला भुकेला चकोर ही भैरवी गाऊन पंडितजींनी रसिकांना मंत्रमूग्ध केले.



दुसऱ्या दिवशी, पुन्हा पं. सदाशिव पवार यांचे सुपुत्र रूपक पवार व रायगडचे सुपूत्र पं. उमेश चौधरी तसेच प्रसिद्ध ज्योतिष व वास्तु विशारद प्रवीण बाबर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.

रविवारी प्रथम आनंद चौधरी, ओंकार शेलार आणि श्रेयस भोईर यांनी तबला सहवादन करून श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले त्यांना लेहरा साथ त्यांचे गुरू सुनील शेलार यांनी केली. त्यांनी ताल तीनताल सादरीकरण केले. यानंतर मधुरा करंबेळकर यांनी सतार वादन करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. त्यांनी पुरिया धनश्री रागामध्ये आलाप जोड झाला, विलंबित तीनतालामध्ये गत, दृत मध्ये बंदिश तसेच तीनतालामध्ये धून सादर केली.त्यानंतर या मोहोत्सवाची सांगता रायगड भूषण पं.उमेश चौधरी यांच्या गायनाने झाली व त्या अनुषंगाने सातारकर रसिकांना शास्त्रीय संगीताची नावीन्यपूर्ण गायन शैली श्रवण करण्याची संधी मिळाली. त्यांनी आपल्या गायनाची सुरवात 'बन ठणका' या केदार रागातील बडा खयालाने केली व छोटा खयाल मधे 'कान्हारे नंदनंदन' व 'चतुर सुघर बैया' तसेच तराणा सादर केला. कार्यक्रमाच्या शेवटी 'हरी भजना विण'हा अभंग तर भवानी दयानी, हेची दान देगा देवा ही भैरवी सादर केली. त्यांना तबल्यावर उत्कृष्ट साथ केली ती पं.रूपक पवार यांनी तर हार्मोनियमवर संगीता सुतार यांनी साथ केली.या संपूर्ण दोन दिवसीय संमेलनाचे सूत्र संचालन वृषाली आमडेकर यांनी केले.

# वाशी खारेपाटात पिण्याच्या पाण्याची समस्या

## २९ गावांची वणवण; हेटवणे धरणाचे काम होण्याची प्रतीक्षा

**पेण : प्रतिनिधी**

तालुक्यातील वाशी–शिर्की खारेपाटातील २९ गावे ४३ वाड्यांना गेले कित्येक वर्षे पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. शहापाडा पाणीपुरवठा योजनेच्या जवळील बोटावर मोजण्याइतकी गावे वगळल्यास उर्वरित सर्वच गावांना जानेवारीपासूनच टँकरचे आणि गाव तलवांचे पाणी पिण्यासाठी व घरगुती कारणासाठी वापरावे लागत आहे.

नागरिकांची हेटवणे ते शहापाडा व शहापाडा ते पेण खारेपाट अशी जीवन प्राधिकरण विभागाकडून हेटवणे धरण ते शहापाडा धरण वाढीव उद्भव पाणीपुरवठा योजनेसाठी ३८ कोटी निधी मंजूर झाला. या योजनेच्या कामाला २०१७ला सुरुवात झाली, परंतु ठेकेदाराच्या हलगर्जीपणामुळे काम पूर्ण झाले नाही. नंतर २७ डिसेंबर



रिटेन्डरीग करून नवीन ठेकेदाराला २२ जुलै २०२२पर्यंत काम पूर्ण करण्याचा कालावधीतसुद्धा पूर्ण केला नाही.

खारेपाट विभागातील तरुण पिढी गावात पाणी नाही म्हणून पेण शहरात स्थलांतरित होत आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पाणीपुरवठ्यासाठी खारेपाट विकास संकल्प संघटनेमार्फत नागरिक आमरण उपोषणास बसले होते. तेव्हा एमजीपी पेण पाणीपुरवठा अधिकारी कोठेकर यांनी लेखी पत्र देऊन २५ डिसेंबर रोजी पाणीपुरवठा वाशी येथील टाकीत सोडण्याचे लेखी आश्वासन दिले होते, परंतु दोन महिने होऊन गेले तरी आजपर्यंत काम पूर्ण केले नाही. यासंदर्भात विचारणा केली असता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पेणचे अधिकारी यांनी आत्ता काम होणार नाही, पाईपलाईन लिकेज आहे. वेळ लागेल, अशी उडवाउडवीची उत्तरे दिली. मग २५ डिसेंबर रोजी वाशीच्या टाकीत पिण्याचे पाणी सोडून सर्व भागात पाणी सोडतो, असे अधिकृत शासनाच्या पत्रावर लिहून दिले होते.

### लेखी आश्वासन

*खारेपाटातील पिण्याच्या पाण्याच्या मागणीसाठी आठ दिवस आमरण उपोषण सुरू होते. १४ डिसेंबर २०२३ रोजी विधान परिषदेत उपमुख्यमंत्री तथा जलसंपदामंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हेटवणे प्रकल्पाच्या चतुर्थ सुप्रमा प्रस्तावास एक महिन्यात मान्यता प्रदान करण्याचे आश्वासन सभागृहात दिले आहे. यासाठी विभागीय स्तरावरून आमरण उपोषण मागे घेण्यासाठी सूचना दिल्या. नंतर हेटवणे मध्यम प्रकल्प विभागाच्या कार्यकारी अभियंता दिनेश्री राजभोज यांनी लेखी पत्र दिल्यानंतर हे उपोषण तूर्तास मागे घेण्यात आले आहे.*

## पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### ई-निविदा सूचना

निविदा सूचना क्र. पमपा/बांधकाम/२३२३/प्र.क्र.०१/५८१/२०२४ दिनांक :– २०/०२/२०२४

**शुध्दीपत्रक**

| अ.क्र. | निविदा . | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | PMC/CE/296/ 2023-24 | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती –क मधील प्लॉट नं.७A,सेक्टर–१६, नवीन पनवेल (प) येथे प्रभाग कार्यालयाची उभारणी करणे. |

या कामाच्या ई–निविदेच्या शुध्दीपत्रकाबाबतची माहिती शासनाच्या 'http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि. २०/०२/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/–
**अतिरिक्त आयुक्त– I**
पनवेल महानगरपालिका

# नेरळ येथे राज्यस्तरीय एनएसएस प्रेरणा मार्गदर्शन



**कर्जत : रामप्रहर वृत्त**

नेरळ येथे जेएसएस रायगड व एसएसटी कॉलेज उल्हासनगर यांच्या माध्यमातून राज्यस्तरीय नेतृत्व प्रशिक्षण शिबिर मंगळवारी (दि.२०) घेण्यात आले. कौशल्य प्रशिक्षणातून नेतृत्व विकास हिच यशाची गुरुकिल्ली असे मत डॉ. विजय कोकणे यांनी कार्यक्रमाप्रसंगी व्यक्त केले.

संस्थापक अध्यक्ष डॉ. मेधा किरीट सोमैया, अध्यक्ष डॉ. नितीन गांधी, उपाध्यक्ष रत्नप्रभा बेल्हेकर, संचालक डॉ. विजय कोकणे व व्यवस्थापक मंडळ यांच्या मार्गदर्शनातून कौशल्य विकास योजनेंतर्गत कार्यक्रम राबवित असतांना संपूर्ण जिल्हाभरात व्यवसाय प्रशिक्षण मार्गदर्शन उपक्रम जनशिक्षण संस्थांच्या माध्यमातून राबवले जात आहे.राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमधील नेतृत्व कौशल्यांचा विकास करण्याच्या उद्देशाने पाच दिवसीय राज्यस्तरीय नेतृत्व प्रशिक्षण शिबिर प्रेरणाचे आयोजन राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि एसएसटी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने नेरळ येथे करण्यात आले. या शिबिरामध्ये महाराष्ट्रातील ३९ विद्यापीठांतील जवळपास २०० स्वयंसेवक आणि एनएसएस कार्यक्रमाधिकारी सहभागी झाले आहेत.

या शिबिराचे उद्घाटन एनएसएस युथ ऑफिसर सुमंत कुमार यादव, मुंबई विद्यापीठाच्या एनएसएस सेलचे कार्यक्रम अधिकारी रमेश देवकर, एसएसटी महाविद्यालयाचे संस्थापक प्राचार्य डॉ. पुरस्वानी, दिलकॅप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शशांक डिगवी, मुंबई विद्यापीठाच्या एनएसएस सेलचे ओएसडी सुशील शिंदे एनएसएसचे ठाणे जिल्हा समन्वयक जीवन विचारे, राज्य संपर्क अधिकारी डॉ. निलेश पाठक, कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, साधनव्यक्ती गणेश भोपी यांच्या उपस्थितीत पार पडले.



**माणगाव : अविष्कार फाउंडेशन इंडिया रायगड शाखेतर्फे येथील ज्योती मेथा यांना राजमाता जिजाऊ पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, विजय मेथा, फाउंडेशनचे जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे, पत्रकार मजीद हाजिते, सलीम शेख, भारती मेथा आदींनी अभिनंदन केले.**

# ताम्हिणी घाटातून दुचाकी दरीत कोसळली; एकाचा मृत्यू

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव–पुणे रस्त्यावर ताम्हिणी घाटात सणसवाडी गावच्या दुचाकी वळणावर रस्त्याच्या कडेला जाऊन दरीत कोसळली. या अपघातात एका तरुणाचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी (दि. १९) दुपारी २.१५ वा.च्या सुमारास घडला.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, प्रवीण भागवत लोहगले (वय २१, रा. बालेवाडी जि. पुणे) हा त्याच्या दुचाकीवर (एमएच १२ एचयू ००६९) त्याच्या मित्रासह ताम्हिणी घाटमार्गे भरधाव वेगात जात असताना वळणावर गाडीवरील ताबा सुटल्याने रस्त्याच्या बाजूला असलेल्या दरीत दुचाकी कोसळून अपघात घडला. या अपघातात मागे बसलेले वैभव काळे (वय–२१, रा. बालेवाडी, जि. पुणे) यांचा मृत्यू झाला. या अपघाताची नोंद माणगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली.

## जिल्हा जलसंधारण अधिकारी
### मृद व जलसंधारण विभाग, रायगड यांचे कार्यालय

**प्लॉट नं. २१५, पहिला मजला, विद्या नगर, चेंढरे–अलिबाग, जि. रायगड**
email: dwcoraigad@gmail.com
निविदा सुचना क्र.३५/ सन २०२३–२४

महाराष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने जिल्हा जलसंधारण अधिकारी, तथा कार्यकारी अभियंता, मृद व जलसंधारण विभाग, रायगड महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामांकरिता ब–१ नमुन्यातील निविदा ई– निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ http://mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा सूचना व इ निविदेसोबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावरू उपलब्ध आहे.

निविदा स्वीकारण्याच्या अथवा नाकारण्याचा अधिकार जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, रायगड यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्वीकारली जाणार नाही. सदर निविदा सूचने मध्ये काही बदल होत असल्यास http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| अ. क्र. | कामाचे नांव– सिमेंट काँक्रीट बंधारा बांधणे, गेटेड सिमेंट काँक्रीट बंधारा व गॅबियन बंधारा बांधणे | निविदेची अंदाजीत एकुण किंमत रु. |
|---|---|---|
| १ | बलीवरे, बलिवरे भोमलवाडी व मालेगाव त. कोठळ ता. कर्जत जि. रायगड | १८,८५,१६३/– |
| २ | चिलठण, नारंगी स्वाली, उजळोलि व खाणाव ता. खालापूर जि. रायगड | ७६,३१,९७७/– |
| ३ | वारदोली ता. पनवेल जि. रायगड | १३,५९,६३४/– |
| ४ | गेटेड सिमेंट काँक्रीट बंधारा बांधणे रानसई खोंडयाचिवाडी ता. उरण जि. रायगड | १७,९३,२१७/– |
| ५ | वैजनाथ ता. रोहा जि. रायगड | ३३,७४,५८६/– |
| ६ | वसाप ता. महाड जि. रायगड | २९,४६,३९७/– |
| ७ | भोगाव बु. ता. पोलादपूर जि. रायगड | ३७,२३,४८८/– |
| ८ | बारसगाव व आंबवडे ता. महाड जि. रायगड | ७९,६७,९३७/– |
| ९ | घुरुपकोंड ता. महाड जि. रायगड | ४०,०३,०९४/– |
| १० | किंजळोली १ व किंजळोली २ ता. महाड जि. रायगड | ७५,१८,६४१/– |
| ११ | निगडे (खोतवाडी), निगडे (गावदेवी मंदिर) व वालन खुर्द ता. महाड जि. रायगड | ७७,९६,४८६/– |
| १२ | आदिस्ते, कोल व टोळ बु. ता. महाड जि. रायगड | ८२,७२,०३३/– |
| १३ | वारंगी ता. महाड जि. रायगड | ४०,९९,९९८/– |
| १४ | चिभावे गॅबियन बंधारा क्र.१ ते ७ | ११,६९,५८८/– |

निविदा उपलब्ध कालावधी – दिनाक १६/०२/२०२४ ते २३/०२/२०२४
Geo-Tagging कालावधी दिनांक २०/०२/२०२४ ते २२/०२/२०२४.
निविदा उघडण्याचा दिंनाक – २६/०२/२०२४
जा.क्र. जिजअ/मृवजवि/रायगड/लेशा/३६२/२०२४
दिनांक :– १४/०२/२०२४

सही/–
**जिल्हा जलसंधारण अधिकारी**
**मृद व जलसंधारण विभाग,**
**रायगड**

## ग्रुप ग्रामपंचायत चिलठण
### ता. खालापूर, जि. रायगड
### जाहिर निविदा

सर्व बांधकाम ठेकेदार व रजिस्टर दुकानदार यांस जाहीर निविदाद्वारे कळविण्यात येते कि, ग्रामपंचायत चिलठण, ता. खालापूर, जि. रायगड यांजकडून ग्रामपंचायत ग्रामानिधी योजनेअंतर्गत कामाच्या अनुभवी इच्छुक जीएसटीधारक ठेकेदाराकडून लिफाफा पद्धतीने मोहोरेवंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी ज्या ठेकेदारांना सदरची कामे करावयाची आहेत त्यांनी आपली निविदा दि. १६/०२/२०२४ पासून २२/०२/२०२४ पर्यंत ठिक स. ११ वा. वाजेपर्यंत समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात सादर करावीत व सदर निविदा दि. २३/०२/२०२४ रोजी ठीक स. ११:०० वा. मा. सरपंच, सदस्य, ठेकेदार यांच्या उपस्थितीत समक्ष उघडण्यात येतील कोणतीही एक अगर सर्व निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार मा. सरपंच यांनी राखून ठेवलेला आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | योजनेचे नाव | इसारा रक्कम | काम पूर्ण कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मौजे चिलठण येथे सांडपाणी व्यवस्थापन करणे | १०००००/– | १५ वा वित्त आयोग सन २०२३/२४ | १०००/– | **३ महिने** |
| २ | रा. जि. प. शाळा चिलठण पाण्याची टाकी दुरुस्ती करणे, | ५००००/– | १५ वा वित्त आयोग सन २०२३/२४ | ५००/– | **३ महिने** |
| ३ | मौजे उसरोळी शाळा डिजिटल करणे. | ८५०००/– | १५ वा वित्त आयोग सन २०२३/२४ | ८५०/– | **३ महिने** |
| ४ | बौद्धवाडी चिलठण येथे सार्वजनिक खर्च करणे (१५% मागासवर्गीय कल्याण निधी) | ८००००/– | ग्रामनिधी सन २०२३/२४ | ८००/– | **३ महिने** |

**अटी व शर्ती :–**
१) सदर कामाची कोरी निविदा दि. १६/०२/२०२४ पासून २२/०२/२०२४ पर्यंत सुट्टीचे दिवस वगळून उपलब्ध होतील.
२) निविदेसोबत एक टवका इसारा रक्कम ग्रामपंचायत चिलठण या नावाने डिमांड ड्राफ्ट स्वरुपात भरल्याची पावती जोडणे आवश्यक आहे.
३) निविदा मंजूर झालेल्या ठेकेदाराला ५०० रूपयाच्या बाँड पेपरवर करारनामा करून घ्यावा लागेल.
४) सदरचे काम पंचायत समितीकडील संबंधित तांत्रिक अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली व ग्रामपंचायतीच्या देखरेखीखाली पूर्ण करावयाचे आहे.
५) काम पूर्ण झाल्यानंतर कामाच्या बिलातून ५ % सुरक्षा अनामत १ टक्के विक्रीकर २ टक्के आयकर करारवर ०.१५ टक्के सर चार्ज व १ टक्का मजूर विमा कामगार इत्यादि रक्कमा कपात केल्या जातील.
६) ठेकेदार शासकीय रजिस्टर व जीएसटी धारक असणे आवश्यक आहे.
७) सुरक्षा अनामत रक्कम कामाचा दर्जा पाहून ६ महिन्याने परत केली जाईल.
८) कामाचे वेळी काही जीवितहानी झाल्यास जबाबदारी ठेकेदाराची राहील.
९) काम सुरू करण्यापूर्वीच फोटो काम सुरू असतानाचे फोटो व काम पूर्ण झाल्यानंतरचे फोटो सादर केल्याशिवाय बिलाची रक्कम अदा केली जाणार नाही.
१०) पोस्टाने आलेल्या निविदा स्वीकारल्या जाणार नाही.

**सही /–**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत चिलठण**

**शिक्का**

**सही /–**
**सरपंच**
**ग्रामपंचायत चिलठण**

## महाराष्ट्र शासन
### महाड सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड (रायगड)

**Email :- mahad.ee@mahapwd.gov.in Ph. No. (02145) 222167**

### निविदा सूचना क्रमांक १६९ सन २०२३-२०२४

खालील कामासाठी सिलबंद निविदा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, महाड, मु.पो.ता. महाड, जिल्हा. रायगड पिनकोड नं. ४०२३०१ दूरध्वनी क्रमांक ०२१४५–२२२१६७ हे महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदार यांचेकडून बी–१ नमुन्यातील निविदा मागवित आहेत. को–या निविदा नमुना दिनांक २१/०२/२०२४ रोजी सकाळी १०.०० पासून ते दिनांक २८/०२/२०२४ रोजी १८.०० वाजे पर्यंत **www.mahapwd.gov.in** या संकेत स्थळावरुन ऑनलाईन खरेदी करण्यांत येतील. व दिनांक २८/०२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता ऑफलाईन पध्दतीने या कार्यालयात सादर कराव्यात व कार्यकारी अभियंता सा. बां. विभाग, महाड हे भरुन पाठविलेल्या निविदा शक्यतो दिनांक २९/०२/२०२४ रोजी ११.०० वाजता उघडतील. निविदा उघडताना सर्व कंत्राटदारांची उपस्थित रहाने आवश्यक आहे. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता यांनी राखून ठेवला आहे.

| अनु. क्रमांक | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत | इसारा/ बयाणा रक्कम | ई–निविदा संचाची किंमत | काम पूर्ण करण्याचा कालावधी (पावसाळा धरून) | नोंदणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | दासगांव गोठे येथे सावित्री नदीवर मोठ्या पूलाचे बांधकाम जोड रस्त्यासह करणेसाठी सविस्तार नकाशे तयार करणे, भूसंपादन प्रास्ताव तयार करणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | ९५०००० | १०००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| २ | दासगांव गोठे येथे सावित्री नदीवर मोठ्या पूलाचे बांधकाम जोड रस्त्यासह करणेसाठी सर्वेक्षण करणे, आराखडा तयार करणे, टोपोग्रामीकल सर्व्हे करणे. तालुका महाङ, जिल्हा रायगड. | ९८०००० | १०००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ३ | दासगांब गोठे येथे सावित्री नदीवर मोठया पूलाचे बांधकाम जोड रस्त्यासह करणेसाठी सावित्री नदीमध्ये चाचणी रंध्रे घेणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. | ९९०००० | १०००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ४ | दासगांव गोठे येथे सावित्री नदीवर मोठया पुलाचे बांधकाम जोड रस्त्यासह करणेसाठी गोठे बाजूकडील पुलांच्या भागासाठी चाचणी रंध्रे घेणे तालुका महाड, जिल्हा रायगड | ९९५००० | १०००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ५ | दासगांव गोठे येथे सावित्री नदीवर मोठ्या पुलाचे बांधकाम जोड रस्त्यासह करणेसाठी दासगांव बाजूकडील पुलाच्या भागासाठी चाचणी रंध्रे घेणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | ९९५००० | १०००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ६ | दासगांव गोठे येथे सावित्री नदीवर मोठ्या पूलाचे बांधकाम जोड रस्त्यासह करणेसाठी दासगांव व गोठे बाजूकडील रस्त्यासाठी चाचणी रंध्रे घेणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. | ९९५००० | १०००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ७ | मोजे चोचिंदे बौध्दावाडी येथे रस्ता तयार करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. | ८२०४५० | ९००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ८ | मौजे मांजरवणे बाटयाचीवाडी ग्रा.पं. मांजरवणे ता. माणगांव येथे बैठक हॉलकडे जाणारा रस्ता तयार करणे, तालुका माणगांव, जिल्हा रायगड. (डोंगरी) | ७९९३२४ | ८००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ९ | मौजे पडवी ता. महाड येथे एस.टी. निवारा शेड बांधणे, सुखसोई पुरविणे. तालुका महाड, जिल्हा रायगड. (आ.स्था.वि.) | ५९४४०० | ६००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| १० | मौजे नाते ता. महाड येथील दत्तामंदीर ते दत्ताराम आंबावले यांचे घरापर्यंत रस्ता काँक्रीटीकरण करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड | ५८८७५० | ६००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग सात व वरील |
| ११ | महाड येथील तालुका पोलीस स्टेशनची दुरूस्ती करणे, तालुका महाड, जिल्हा रायगड. | ४४७४९७ | ५००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| १२ | मौजे वारंगी रामवाडी, ता. महाड येथे सभामंडप बांधणे, (अ.जा.) तालुका महाड,जिल्हा रायगड. (खा.स्था.बि.) | ४२२८९० | ५००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग आठ व वरील |
| १३ | काळीज, ता. महाड बौध्दावाडी येथील बौध्द विहारासमोरील सभामंडप बांधणे, (अ.जा.) तालुका महाड, जिल्हा रायगड. | ४२१४४४ | ५००० | ५९०/– | ६ महिने | वर्ग आठ व वरील |

**टिप :–** १) तपशिलवार निविदा सुचना https://mahapwd.gov.in या संकेतस्थळावर पाहता किंवा विकत घेता येतील.

**जा.क्र.मवि/लेशा/निविदा/१०३८**
**दिनांक : १७/०२/२०२४**

**सही/**
**कार्यकारी अभियंता**
**महाड (सा.बां.) विभाग, महाड**

**विमाका/ कोवि/२०२३–२०२४/४०३**

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ
### (महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक १४६/२०२३–२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | रानसई पाणीपुरवठा योजना.. म.औ.वि. महामंडळाच्या रानसई उप विभाग, पनवेल अंतर्गत भंगार साहित्याचा लिलाव करणे, कळंबोली जंक्शन ते उरण फाटा दरम्यानची जुन्या मृदु पोलादी, सी.आय. जलवाहिन्या, स्पेशल्स “जसे आहे जेथे आहे” या तत्वावर काढणे व पनवेल व तळोजा येथील भांडारगृहात आणणे. | ₹ ०.०० |

उपरोक्त कामाकरीता निविदा प्रपत्र दिनांक २१/०२/२०२४ ते दिनांक ०६/०३/२०२४ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामाबाबत दिनांक २७/०२/२०२४ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २९/०२/२०२४ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

## जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धा

# वैभव शिंदेला विजेतेपद




**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा कॅरम असोसिएशन व अभिजित कॅरम क्लब, अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथे आयोजित करण्यात आलेल्या पुरुष एकेरी जिल्हा मानांकन कॅरम स्पर्धेत कामोठे येथील वैभव शिंदे याने विजेतेपद पटकावले. पनवेलचा अश्रफ खान उपविजेता ठरला. अलिबागचा अभिजित तुळपुळे व पनवेलचा शाम भायवट यांनी तृतीय क्रमांक मिळवला.

अलिबाग येथील क्रीडाभुवन येथे ही स्पर्धा खेळविण्यात आली. या स्पर्धेमध्ये रायगड जिल्ह्यातील १३२ खेळाडू सहभागी झाले होते. विजेत्या खेळाडूस सात हजार रुपये व चषक, उपविजेत्यास पाच हजार रुपये व चषक, तृतीय व चतुर्थ क्रमांकासाठी प्रत्येकी २५०० रुपये व चषक, पाच ते आठ क्रमांकासाठी प्रत्येकी एक हजार रुपये व चषक, नऊ ते १६ क्रमांकासाठी प्रत्येकी ५०० रुपये बक्षीस देण्यात आले.

कमळ नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष सतीशचंद्र पाटील यांच्या हस्ते स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले. रायगड जिल्हा कॅरम असोसिएशनचे अध्यक्ष गिरीष तुळपुळे, सेक्रेटरी दीपक साळवी, स्पर्धेचे पंच प्रमुख आशिष बागकर या वेळी उपस्थित होते. अभिजित तुळपुळे तुळपुळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## डब्ल्यूपीएलचा शुक्रवारपासून थरार

**बंगळुरु : वृत्तसंस्था**

**ग्रँड ओपनिंग समारंभाला कलाकार लावणार हजेरी**

वुमन्स प्रीमियर लीग (डब्ल्यूपीएल)चा दुसरा हंगाम सुरू होत असून या स्पर्धेचे उद्घाटन येत्या शुक्रवारी (दि. २३) बंगळुरू येथील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर होणार आहे. या समारंभात अनेक कलाकार हजेरी लावणार आहेत.

सिद्धार्थ मल्होत्रा आणि कार्तिक आर्यन हे बॉलीवूडमधील दोन प्रसिद्ध अभिनेते वुमन्स प्रीमियर लीग उद्घाटन समारंभाला उपस्थिती लावणार आहेत. डब्ल्यूपीएलच्या सोशल मीडिया अकाउंटवरून याबाबत माहिती देण्यात आली. यासोबतच फोटो शेअर करण्यात आला आहे. या फोटोमध्ये सिद्धार्थ मल्होत्रा आणि कार्तिक आर्यन दिसत आहेत. या फोटोला कॅप्शन देण्यात आले, ये किंडम नहीं, क्विनडम हैं. डब्ल्यूपीएलचा उद्घाटन समारंभ पाहा २३ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता सुरू होईल.

स्पर्धेतील पहिले ११ सामने बंगळुरू येथे खेळले जातील. यानंतर पाच संघ दिल्लीला येतील, जिथे एलिमिनेटरसह अंतिम सामना खेळला जाईल. लीग राउंडमध्ये २० सामने खेळले जातील आणि त्यानंतर एलिमिनेटर आणि अंतिम सामना खेळवला जाईल.

# पुणे संघ आमदार चषकाचा मानकरी



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली क्रिकेट असोसिएशन आयोजित राज्यस्तरीय सीजन बॉल आमदार चषक क्रिकेट स्पर्धेत पुण्याच्या पीबीकेजेसीए संघाने विजेतेपद पटकाविले. नवी मुंबई नेरूळचा एसआरटी इलेव्हन संघ उपविजेता ठरला.

पी.जी जाधव पटांगणावर १० फेब्रुवारी ते १९ फेब्रुवारीदरम्यान स्पर्धा खेळविण्यात आली. नामांकित क्रिकेटपटूंना या स्पर्धेच्या माध्यमातून आमंत्रित करण्यात आले होते. यामध्ये प्रवीण तांबे, योगेश टाकवले हे आयपीएलचे खेळाडू; योगेश पवार, अक्षय दरेकर, पुष्कराज चव्हाण, जय बिस्ता, सिद्धार्थ म्हात्रे आदी रणजी स्पर्धेतील खेळाडू; तर सागर सावंत, देवांश तांडेल, निकुंज विठ्ठलानी, साई चव्हाण या महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केलेल्या खेळाडूंचा समावेश होता. स्पर्धेचे उद्घाटन आमदार महेंद्र थोरवे व पोलीस उपअधीक्षक विक्रम कदम यांच्या हस्ते झाले.

असोसिएशनचे अध्यक्ष यशवंत साबळे व पोलीस निरीक्षक शितल कुमार राऊत यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. त्याचप्रमाणे मालिकावीर ऋषिकेश बारणे, उत्कृष्ट फलंदाज ऋतुराज वेलणकर, उत्कृष्ट गोलंदाज सागर सावंत, उत्कृष्ट यष्टीरक्षक साई चव्हाण या खेळाडूंना स्मृतीचिन्ह देऊन गौरविण्यात आले. महाराष्ट्राच्या १४ वर्ष वयोगटातील संघात खोपोलीतील तेजस गिलबिले व स्वराज्य थरकुडे आणि १५ वर्ष वयोगटातील मुलींच्या संघात समृद्धी कांबळे व स्वरा खेडकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचाही सन्मान करण्यात आला.

बक्षीस वितरण समारंभ उद्योजक विक्रम साबळे, खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यवाह किशोर पाटील, शिवसेनेचे दिनेश थोरवे, दिलीप पोरवाल, सुनील नांदे, संजय तन्ना, अमोल जाधव, चंद्रप्पा आनीवार, अविनाश तावडे, संजय तावडे, शंकर दळवी आदी उपस्थित होते.







**मोहोपाडा : माजी जिल्हा परिषद सदस्य पद्मा सुरेश पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादीचे जिल्हा चिटणीस सुरेश पाटील व वडगाव ग्रुप ग्रामपंचायतीचे माजी सरपंच अविनाश पाटील यांच्या वतीने प्रकाशझोतातील भव्य ग्रामीण क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आले होती. उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी व रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुधाकर घारे यांनी या स्पर्धेस भेट दिली. या वेळी भाताण ग्रामपंचायतीचे सदस्य दीपक ठाकूर, माजी उपसरपंच मंदा ठाकूर, सुरेश पाटील, पद्मा पाटील आदी उपस्थित होते.**

# बुद्धीबळ स्पर्धेत लोबोला दुहेरी मुकुट

**मुंबई : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५०व्या राज्याभिषेक दिनानिमित्त श्री छत्रपती शिवाजी स्मारक मंडळ (ट्रस्ट) मुंबई आणि आयडियल स्पोर्ट्स अकॅडमी आयोजित श्री शिवाजी मंदिर बुद्धीबळ स्पर्धेत लोबो देटीन याने सात व आठ वर्षाखालील मुलांचे विजेतेपद मिळवून दुहेरी मुकुट पटकाविला.

मुंबई शहर जिल्हा बुद्धीबळ संघटना मान्यतेने झालेल्या स्पर्धेत आठ वर्षाखालील गटात अपराजित लोबोने (पाच गुण) ओमिशा अरोराला सहज चकवून मुलाचे विजेतेपद पटकाविले. मुलांमध्ये ओम गणूने (चार गुण) द्वितीय, प्रथम मेहताने (चार गुण) तृतीय, मालव देसाईने (तीन गुण) चतुर्थ, आर्शिव गोयलने (२.५ गुण) पाचवा; तर मुलींमध्ये अनिश्का बियाणीने (तीन गुण) प्रथम, ओमिशा अरोराने (तीन गुण) द्वितीय, अनन्या चव्हाणने (तीन गुण) तृतीय क्रमांक मिळविला.

१० वर्षाखालील मुलांमध्ये निवान छेडाने (४.५ गुण) प्रथम, नील भटने (चार गुण) द्वितीय, रुद्रांश पाटीलने (चार गुण) तृतीय, आरिष गांधीने (३.५ गुण) चौथा, जश पारीखने (तीन गुण) पाचवा; तर मुलींमध्ये सर्वा परेलकरने (चार गुण) प्रथम, आराध्या पुरोने (तीन गुण) द्वितीय, येशा तयालने (तीन गुण) तृतीय पुरस्कार मिळविला.



१२ वर्षाखालील मुलांमध्ये अमोघ आंब्रेने (पाच गुण) प्रथम, लोबो फेरदिनने (चार गुण) द्वितीय, निशांत पन्हाळकरने (३.५ गुण) तृतीय, विवान कांबळेने (३.५ गुण) चौथा, अमान गुप्ताने (तीन गुण) पाचवा आणि मुलींमध्ये वर्री गोगरीने (तीन गुण) प्रथम, साईशा मुळेने (तीन गुण) द्वितीय, शहाना कृष्णनने (२.५ गुण) तृतीय क्रमांक मिळविला.

१४ वर्षाखालील मुलांच्या गटात अर्णव सावंतने प्रथम (४.५ गुण), अर्जुन पाधारीयाने (३.५ गुण) द्वितीय, अंशुमन समलने (३.५ गुण) तृतीय, आयुष पाटीलने (तीन गुण) चौथा, अग विहानने (तीन गुण) पाचवा आणि मुलींमध्ये मल्लिक भाविनीने (२.५ गुण) प्रथम क्रमांक मिळविला.

पारितोषिक वितरण मंडळाचे अध्यक्ष सुधीर सावंत, सेक्रेटरी संतोष शिंदे, कार्यकारी विश्वस्त बजरंग चव्हाण, विश्वस्त ज्ञानेश महाराव, पत्रकार सुहास जोशी आदींच्या उपस्थितीत झाले.

## पेण ओढांगीचे राष्ट्रीय कबड्डीपटू भालचंद्र पाटील यांचे निधन

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील ओढांगी गावचे प्रसिद्ध राष्ट्रीय कबड्डीपटू भालचंद्र जनार्दन पाटील यांचे नुकतेच अल्पश: आजाराने निधन झाले. १९८५ ते १९९५ या दशकात मफतलाल इंजिनअरिंग या कंपनीतून व्यावसायिक कबड्डीपटू म्हणून त्यांनी उज्ज्वल यश संपादित केले होते. काल्हेर खारेगाव या संघातून ठाणे असोसिएशनसाठी खेळत असताना तब्बल सलग सहा वेळा ठाणे जिल्हा संघातून त्यांची निवड झाली होती.



महाराष्ट्राच्या संघातून राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा खेळण्याचा बहुमान भालचंद्र पाटील यांनी मिळवलाच, पण त्यांचे क्षेत्ररक्षण हे भल्या भल्यांच्या छातीत धडकी भरविणारे होते. भरदार शरीरयष्टी आणि चित्याची चपळता, सतत कबड्डीचा ध्यास असलेल्या पाटील यांनी ठाणे व रायगड जिल्ह्यातील अनेक कबड्डीच्या मैदानात नेत्रदीपक कामगिरी करुन कबड्डी रसिकांच्या मनावर राज्य केले.

अनेक वर्ष ते वायुसुत क्रीडामंडळ ओढांगी-पेण या मंडळाचे अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. त्यांनी कबड्डी खेळास प्रोत्साहन देण्यासाठी दरवर्षी अनेक स्पर्धांचे आयोजन केले होते. किरण पाटील, सुभाष पाटील, मुरलीधर पाटील यांसारखे कबड्डीपट्टू त्यांनी घडविले. भालचंद्र पाटील यांच्या अंत्यदर्शनास सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, क्रीडा क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

# प्रथम श्रेणी कबड्डी स्पर्धेत विजय क्लब विजेता

**मुंबई : प्रतिनिधी**

विजय नवनाथ मंडळाने अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या पुरुष प्रथम श्रेणी गटात दादरच्या विजय क्लबने विजेतेपद मिळविले. विजय क्लबचा राज नाटेकर स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला.

सेनापती बापट मार्ग, लोअर परेल येथील फिनिक्स टॉवर शेजारील मैदानात झालेल्या पुरुषांच्या अंतिम सामन्यात विजय क्लबने अंकुर स्पोर्ट्सचा प्रतिकार २७-२२ असा मोडून काढत रोख रक्कम व सुवर्ण चषक आपल्या नावे केला.




दोन्ही संघ तुल्यबळ असल्याने एकमेकांचा अंदाज घेत उभय संघांनी सावध सुरुवात केली. पूर्वार्धात विजय क्लबने १४-१० अशी आघाडी घेतली. उत्तरार्धात संयमाने खेळ करीत ही आघाडी आपल्या हातून निसटू न देता आपला विजय साकारला. विजय क्लबचे या हंगामातील हे दुसरे जिल्हास्तरीय अजिंक्यपद. राज नाटेकरच्या धूर्त चढाया त्याला विजय दिवेकरची मिळालेली पकडीची साथ यामुळेच विजय क्लब हे यश मिळवू शकले. अंकुर स्पोर्ट्सकडून अभिमन्यू पाटील, सिद्धेश तटकरे यांनी अंतिम क्षणापर्यंत कडवी लढत दिली, पण संघाला विजय मिळवून देण्यात ते कमी पडले.

या अगोदर झालेल्या उपांत्य सामन्यात विजय क्लबने सुनील स्पोर्ट्सचा (२८-२३) असा, तर अंकुरने लायन्सचा (३४-१८) असा पराभव करीत अंतिम फेरीत धडक दिली होती. विजेत्या सर्व संघांना रोख रक्कम व चषक देण्यात आला. अंकुरच्याच अभिमन्यू पाटील आणि सिद्धेश तटकरे यांची अनुक्रमे स्पर्धेतील उत्कृष्ट चढाई व पकडीचा खेळाडू म्हणून निवड करण्यात आली. त्या दोघांना प्रत्येकी रिफ्रजेटर देऊन गौरविण्यात आले.

## श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ

# पंजा लढवणे स्पर्धेला उदंड प्रतिसाद



**मुंबई : प्रतिनिधी**

श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ स्पर्धेचा थरार मुंबई शहर व मुंबई उपनगरात अंतिम टप्प्यात पोहचला असून २१ फेब्रुवारीला या स्पर्धेचा समारोप आहे. महाकुंभ अंतर्गत प्रतीक्षा नगर येथे झालेल्या पंजा लढवणे स्पर्धेत जवळजवळ ९०० खेळाडूंनी भाग घेतला. या स्पर्धेत जबरदस्त चुरस पाहायला मिळाली.

महाराष्ट्र राज्य शासन, मुंबई महापालिका आणि क्रीडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने व मुंबई पोलीस, मुंबई विद्यापीठ, एसएनडीटी विद्यापीठ व मुंबई शहर व मुंबई उपनगर येथील संबंधित क्रीडा संघटना यांच्या सहकार्याने मुंबई उपनगर पालकमंत्री मंगल प्रभात लोढा यांच्या मार्गदर्शनाखाली विविध स्पर्धा सुरू आहेत.

२१ फेब्रुवारी रोजी मालाड (प) मालवणी येथील क्रीडाभारती मैदानावर मल्लखांब, लंगडी, पंजा लढणे, कबड्डी, कुस्ती, रस्सी खेच, ढोल ताशा व लेझीम या खेळांच्या अंतिम स्पर्धा पार पडणार आहेत. त्यानंतर या स्पर्धांचा बक्षीस समारंभ क्रीडामंत्री संजय बनसोडे, मंत्री मंगल प्रभात लोढा, क्रीडा भारती अखिल भारतीय संघटनमंत्री प्रसाद महानकर, मुंबई महापालिका शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ, मुंबई उपनगर जिल्हा अधिकारी क्षीरसागर आदी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

पंजा लढवणे स्पर्धेत सहा विभागांतील प्रत्येक गटातून प्रथम येणाऱ्या खेळाडूला अंतिम फेरीत स्थान दिले जाणार आहे. त्यातून या स्पर्धेतील अंतिम विजेते निवडण्यात येईल.

### प्रतीक्षानगरात झालेल्या स्पर्धेत प्राविण्य मिळविलेले खेळाडू

१४ वर्षाखालील मुलांच्या ५० किलो वजनी गटात नयन तरळ, उस्मान खान, सौरभ पांड्ये; तर मुलींच्या ४७ किलोवरील वजनी गटात प्रांजली गौरव, रिझवाना शेख, झोया शेख यांनी प्रथम तीन क्रमांक मिळवले.

१७ वर्षाखालील मुलांच्या ७० किलो वजनी गटात आकाश गुप्ता, मो. अनस, झीशान खान यांनी; तर मुलींच्या ६० किलो वजनी गटात रेखा चव्हाण, चंद्रा औजी, नम्रता शिवगण यांनी प्रथम तीन क्रमांक मिळवले.

१७ वर्षावरील मुलांच्या ६३ किलो वजनी गटात सय्यद महबूब, निलेश माजरे, स्वप्नील कांबळे; तर मुलींच्या ५४ किलो वजनी गटात नीता नवाडकर, सुवर्णा कांबळे, नीतू यादव यांनी प्रथम तीन क्रमांक मिळवले.

## चौथ्या कसोटीसाठी भारतीय खेळाडू रांची येथे दाखल

**रांची : वृत्तसंस्था**

भारतीय संघाने इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे. २३ फेब्रुवारीपासून सुरू होणाऱ्या चौथ्या कसोटीसाठी भारत व इंग्लंडचे खेळाडू चार्टर्ड फ्लाईटने रांची येथे नुकतेच दाखल झाले आहेत. रोहित शर्मा, रवींद्र जडेजा, मोहम्मद सिराज, आकाश दीप असे बरेच भारतीय खेळाडू रांची विमानतळावरून बाहेर येताना दिसले.

दरम्यान, वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहला चौथ्या कसोटीत विश्रांती दिली जाऊ शकते, तर लोकेश राहुल पुनरागमनासाठी सज्ज झाला आहे. तो रांची कसोटीत उतरण्यासाठी सज्ज झाला आहे, अशी माहिती बीसीसीआयच्या सूत्रांनी दिली.

# 'त्या' घटनेनंतर मयांक अग्रवाल दक्ष

**मुंबई : प्रतिनिधी**

टीम इंडियाचा क्रिकेटपटू मयांक अग्रवाल गेल्या वेळी विमानाने प्रवास करत असताना आजारी पडला, मात्र या वेळी या क्रिकेटपटूने कोणताही धोका पत्करला नाही आणि स्वत:ची पाण्याची बाटली घेऊन फ्लाइटमध्ये प्रवास करताना दिसला. जानेवारीत विमानात पाणी प्यायल्याने त्याची तब्येत अचानक बिघडली. त्यानंतर मयांकला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते.

या प्रसंगानंतर सावध झालेला मयांकने या वेळी पूर्ण काळजी घेतली आणि पाण्याची बाटली दाखवताना त्याच्या इन्स्टा स्टोरीमध्ये म्हटले, कोणतीही रिस्क घ्यायची नाही बाबा.



रणजी करंडक स्पर्धेतील कर्नाटकचा कर्णधार मयांक अग्रवाल त्याच्या सहकाऱ्यांसोबत त्रिपुराहून नवी दिल्लीला जात असताना त्याच्यासोबत हा प्रकार घडला. टेक ऑफच्या काही वेळापूर्वीच तो आजारी पडला. मयांकने पाऊचमध्ये पाणी आहे असे समजून तो प्यायला होता, पण त्यानंतर त्याला त्रास झाला आणि छातीत जळजळ होऊ लागली. यानंतर मयांकला आगरतळा रुग्णालयात दाखल करण्यात आले.

मयांकला पोटदुखी, अल्सर आणि अन्न नीट न पचण्याची समस्या होती. यानंतर त्याच्या मॅनेजरमार्फत पोलिसांत तक्रारही दाखल केली होती. यामुळे मयांक पुढील दोन रणजी सामन्यांमधून बाहेर पडल्याने त्याच्या संघाला मोठा धक्का बसला.

मयांक अग्रवाल सध्या टीम इंडियातून बाहेर आहे. त्याने २०२२मध्ये श्रीलंकेविरुद्ध भारताकडून शेवटची कसोटी खेळली होती, तर शेवटचा वनडे सामना २०२०मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळला होता. कर्नाटकसाठी मयंक चांगल्या फॉर्ममध्ये आहे. त्याने गुजरात आणि गोव्याविरुद्ध शतके झळकावली आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com